वज्रमय शब्द व एकलव्य विचार असणारे एकमेव

www.punyymat.com
Email - nvithal.fams@gmail.com

साप्ताहिक

# पुण्यमत

पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रसिद्ध होणारे

- RNI.No.MAHMAR /2008/28522
- Decl. No. PHM/SR/188/2008

पुण्यमत



मुख्य संपादक
विठ्ठलराव पवार

◆ वर्ष १० ◆ अंक ५२ वा ◆
◆ गुरूवार दि.१० ते १६ जुलै २०१४ ◆

पाने ४
किंमत २ रुपये

## चार राज्यांवर दुष्काळाचे सावट

नवी दिल्ली : मॉन्सून दडी मारून बसल्याने देश महाराष्ट्र आणि देशातील आणखी तीन प्रमुख राज्यांवर दुष्काळाचे सावट पसरले आहे. हीच स्थिती कायम राहिल्यास कृषी उत्पन्न घटण्यासोबतच पाणी आणि विजेच्या गंभीर संकटाला तोंड द्यावे लागू शकते. एका वृत्तसंस्थेने देशभरातील स्थितीचा अंदाज घेऊन एक अहवाल जारी केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांत दुष्काळसदृश स्थिती आहे. पावसाने हुलकावणी दिल्याने अद्यापही अनेक भागांतील पेरण्या रखडल्या आहेत. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत देशात सरासरीच्या ४३ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. मॉन्सून अनुकूल नसल्याच्या वृत्ताने आधीच खाद्यान्न, भाजीपाला व फळांच्या किमती वधारल्या आहेत. येत्या दिवसांत या किमती आणखी भडकण्याची चिन्हे आहेत.

# पोशिंद्याच्या हितासाठी.... घेतला कांदा हातात!

# शरद जोशी रस्त्यावर उतरणार!

## ४ ऑगस्टला नाशिक येथून सुरुवात;लाखो शेतकरी उतरणार रस्त्यावर - विठ्ठल पवार



**शेतकरी संघटनेचे संस्थापक शेतकऱ्यांचे पंचप्राण शेतकऱ्यांच्या हितासाठी ४ ऑगस्टपासून हातात कांदा घेऊन लाखो शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरणार आहेत. १० जुलैला शेगाव येथे झालेल्या राज्यकार्यकारिणीत हा निर्णय घेण्यात आला. शरद जोशी साहेब यांची तब्येत ठणठणीत झाल्याने कार्यकर्ते जोशात आहेत. मात्र शरद जोशींनी उगारलेला कांदा मोदी सरकारचा चांगलाच वांदा करणार हे या आंदोलनाच्या इशाऱ्याने दिसेलच येथूनच राज्यातील उस, कांदा, कापूर, हरभरा, मुग कडधान्य रास्त भाव आंदोलनाला सुरूवात होणार आहे.**

शेगांव, बुलढाणा (विठ्ठल पवार) - गेल्या ३ वर्षापासून महाराष्ट्रात या ना त्या कारणाने प्रचंड दुष्काळ स्थिती निर्माण झालेली आहे. यावर्षी फेब्रुवारी/मार्चमध्ये हाता तोंडाला आलेली पिके आसमाणी संकटामुळे पुरती नेस्ता नाबूत झाल्याने जगाचा पोशिंदा शेतकऱ्यांवर आर्थिक संकटांची कुऱ्हाडच कोसळली आहे. या परिस्थितीत कशी बशी उरली सुरलेली पिके; धान्य, कांदा, बटाटा याला शेतकऱ्यांना दोन पैसे मिळवण्यांच्या आतच केंद्र सरकारने कांदा-बटाट्यावर निर्यात बंदी घातली.

केंद्रात नवं राज्य, नवि प्रजा आल्याने धास्ती घेतलेल्या राज्य सरकारांनी सरकारी कर्मचारी, व्यापारी, उद्योगजकांना पॅकेजवर पॅकेज देण्यास सुरवात केली तर सरकारी, निम सरकारी कर्मचाऱ्यांना भरपूर वेतनवाढ, ६ वा, ७ वा आयोग, मागील फरक, मोठ्या प्रमाणात बोनस देऊन त्यांची शिमग्या आधिच दिवाळी करून टाकली.


मात्र कांदा-बटाटा, धान्य शेतमालाला दोन पैसे भाववाढ झाली की लगेच निर्यात बंदी म्हणजे मोदी सरकारने राज्यातील शेतकऱ्यांची केलेली हत्या आहे.

कोणत्याच शेतमालाला रास्त हमी भाव नाही. की त्यात १५ ते २०% एवढी वाढ करायला पाहिजे ती केली नाही. आधारभूत किमंतीत एक दमडाही वाढ केली नाही. आठ लाख कोटींचं पिकं कर्ज शेतकऱ्यांना दिलं म्हणजे शेतकऱ्यांची सुगी झाली असे नाही तर मोदी सरकारने परभुन केंद्रीय अर्थमंत्र्यांन करवी शेतकऱ्यांच्या डोळ्यांवर कर्जाचे जे भुत उभे केले आहे ते उतरविण्यासाठी शेतकरी संघटनेचे प्रणेते सर्वेसर्वा मा.शरद जोशी साहेब कांदा घेऊन ४ ऑगस्ट रोजी रस्त्यावर उतरणार आहेत. यात महाराष्ट्रातील लाखो शेतकरी त्यांचे मागे उभे राहून मोदी सरकारला कांदा उगारतील.

भाजपा सरकारला कांद्यांचा इंगा माहीत असताना कांदा निर्यात बंदी का लावली. गेली कांदा निर्यात शुल्क ३०० वरून ५०० रुपये वाढविला.

(पान ३वर)

## संपूर्ण राज्यावर शेती, पाणी, रोजगाराचे सकंट:विठ्ठल पवार



आज पाण्यासाठी युध्दे होतील असे चित्र तयार झाले आहे. महापुरामध्ये शेतीसाठी पिण्यासाठी व उद्योगधंद्यासाठी पाण्याची अत्यंत कमतरता भासत आहे. काटाळू लोक जमिन उपलब्ध असताना पाणी आणि विज या दोन्हींच्या कमतरतेमुळे शेती व्यवसाय अडचणीत आलेला आहे. तसेच भार नियमामुळे शेती, उद्योग बंद पडत आहे. मजुरांना काम मिळत नाही. संबंध अर्थव्यवस्था धोक्यात आलेली आहे. स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षाचा प्रदीर्घ कालखंड संपल्यानंतरही सुधारणा होण्याऐवजी संकटात वाढ होत आहे. सरकारकडून वित्त व पाण्याची मुबलक उपलब्धता होणार नाही हे स्पष्ट झाले आहे. असा सनसनाटी आरोप शरद जोशी प्रणेते शेतकरी संघटनेच्या वतीने राज्य सरकारला विठ्ठल पवार यांनी केला आहे. कृष्णा लवादाचे (बछावत आयोग) नुसार महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी सुध्दा महाराष्ट्र सरकारला आडवता आले नाही. सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये मुबलक पाऊस पडत असताना व महाराष्ट्रात अनेक नद्यांद्वारे पाणी कर्नाटक, आंध्रमध्ये वाहून जात आहे, हे पाणी सह्याद्रीमध्येच धरणे बांधून अडविले

(पान ३वर)

## "ग्लोबल अॅग्रो फाउंडेशन योध्दा शेतकरी" पुरस्कारासाठी नावे पाठविण्याचे आव्हान

सा.पुण्यमत, ग्लोबल अॅग्रो फाऊंडेशन वेलवाडी, पुणे जिल्हा सा.संपादक, पत्रकार, युप वर्धापन दिनानिमित्त २७ जुलैला इंदापूर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून ग्लोबल अॅग्रो फाऊंडेशनच्या वतीने दिले जाणारे पुरस्कारासाठी २२ जुलैपर्यंत नावे मागविण्यात येत आहेत. पुरस्काराचे हे ११ वे वर्ष असून 'राष्ट्र रत्न योध्दा शेतकरी, क्रांतीसिंह नाना पाटील प्रति सरकार (पत्री सरकार) पुरस्कार, विशेष सामाजिक कार्य, पत्रकारिता, , सामाजिक, राष्ट्ररत्न जिजाऊ, राष्ट्ररत्न रहा'


(पान ४वर)

## सन १४-१५ गळीत हंगामासाठी प्रति टन उसदर ३५०० रुपये उत्पादन खर्चाची मागणी

पुणे (रवि पवार) : सन १४-१५ च्या गळीत हंगामसाठी उत्पादन खर्च ३५००/- रुपये प्रती टन अधिक स्वामीनाधन समितीच्या शिफारशीप्रमाणे ५० टक्के नफा धरून ऊसदर एफआरपी ऐवजी एमआरपी दर देण्याचा ३१ जुनै पूर्वी निर्णय घ्या. मा. शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे साखर आयुक्त विजय सिंघाल व मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना १ जुलै व ३ जुलै रोजी निवेदन देऊन वरील मागणी करण्यात आली.

यावेळी विठ्ठलराव पवार प्रदेश सरचिटणीस यांचे सह मारुती पवार,

(पान ४वर)



# सरकार कायदा पायदळी तुडविते...
# तेंव्हा शेतकरी संघटना तो हातात घेते

केंद्र सरकार जशी पेट्रोलची दरवाढ रूपयात करते (उदा. ४.७५ पैसे प्रतीवाढ) आणि उपभोक्त्यांनी आंदोलने केली की ७२ पैसे कमी करते त्याच्या उलट परिस्थिती शेतमालावरील आधारभूत किंमतीमध्ये होत आहे. ऊसाचा उत्पादन खर्च ३५००/- रू. प्रतीटन तर केंद्र सरकारने आधारभूत किंमत २१५०/- रू. प्रतिटन दर जाहीर केला. म्हणजे शेतकऱ्यांनी १ रूपया शेताला लावला की सरकार शेतकऱ्याला ५२ पैसे आधारभूत किंमत देते. म्हणजे उत्पादक शेतकऱ्यांना ४८ पैसे उत्पादन खर्चात तोटा मग १ रूपया शेतकऱ्याने कर्ज घेतले त्याचे १ रू. २५ पैसे शेतकरी व्याजासह परत करी करणार हा संशोधनाचा विषय असून यावर कृषीमुल्य आयोगाने व पंतप्रधान नरेंद्र मोदी कृषभ अन्नधान्य मंत्री राधा मोहन, रामविलास पासवान, यांनी एक तर पीएचडी करावी किंवा स्वतः शेती करावी. तसेच शेतकऱ्यांना शेती परवडत नाही म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री, सहकारमंत्री, काही केंद्रीय मंत्री शेतीला जोडधंदा म्हणून शेतकऱ्यांनी (गायी, म्हैस) पाळून दुधाचा व्यवसाय

| पिकाचे नाव | आधारभूत किंमत (१३-१४) | किमतीत वाढ रूपये (१४-१५) | अपेक्षीत वाढ रू. |
|---|---|---|---|
| धान (ग्रेड ए) | १२८० | केंद्र सरकारने सन १४-१५ साठी कोणत्याही शेती उत्पादनासाठी एक दमडाही वाढ केलेली नाही | ३००० |
| धान (सर्वसाधारण) | १२५० | | ३५०० |
| ज्वारी (मालदांडी) | १५२० | | ३२०० |
| ज्वारी (संकरीत) | १५०० | | ३००० |
| रागी | १५०० | | २५०० |
| बाजरी | ११७५ | | ३००० |
| मका | ११७५ | | २५०० |
| तूर | ३८५० | | ६००० |
| मुग | ४४०० | | ६००० |
| उडीद | ४३०० | | ६००० |
| भुईमुग | ३७०० | | ६००० |
| सुर्यफुल | ३७०० | | ६००० |
| तीळ | ४२०० | | ६००० |
| कारळा | ३५०० | | ६००० |
| सोयीबीन (पिवळा) | २२४० | | ६००० |
| सोयाबीन (काळा) | २२०० | | ६००० |
| कापूस (लांब धागा) | ३९०० | | ९००० |
| कापूस (मध्यम धागा) | ३६०० | | ८००० |
| ऊस | १७१५ प्र. टन | | ४०५० |

करावा म्हणून सल्ला देणार नाहीत? दूधाचा उत्पादन खर्च २७ रू. ते ३२ रू. प्रती लिटर आणि राज्य सरकार दुधाला खरेदी भाव देते म्हणजे शेतकऱ्यांना जो जोडधंदा दिला त्यातही १ लिटर दुधामागे सरासरी १५ रूपये तोटा म्हणजे शेतकऱ्यांनी इथेही १ रू. लावला तर सरकार आधारभूत किंमतीत ५२ पैसे तोटा करते आणि शेतकऱ्यांच्या हातात ४८ पैसे पडतात. सांगा अर्थमंत्री अरूण जेटणि साहेब शेतकऱ्यांचे कर्ज कसे परत होणार? मी विठ्ठलराव पवार एक शेतकरी आणि शेतकरी संघटनेचा प्रतिनिधी म्हणून केंद्र व राज्य सरकारला आवाहन करतो की, शेतमालाच्या आधारभूत वरील किमती कशा कमी आहेत आणि शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर कसा आणि कोणी उभा केला याचे खुलेआम चर्चा, केंद्र व राज्य सरकारने घडवून आणावी. त्यात एका बाजूला केंद्र व राज्य सरकारचे कृषिक्षेत्रातील मंत्री, पंतप्रधान, मुख्यमंत्री, सर्व पक्षांचे अध्यक्ष व संबंधीत अधिकारी, सचिव वगैरे तर दुसऱ्या बाजूला मा. शरद जोशी, रविभाऊ देवांगे, राजूभाऊ शेट्टी, पी. चेंगल रेड्डी, देवसिंग मनी, सतनामसिंग बेरू, प्रकाश मानकर, अशोक ढवळे, पाशा पटेल, ज्येष्ठ पत्रकार अमरकाका हबीब, ज्येष्ठ पत्रकार निखील वागळे भाऊ तोरसेकर अशी खुली चर्चा व्हावी? दर कसे बरोबर दिले हे सरकारने सांगावे आणि कसे कमी आहेत. (प्रॅक्टीकल फिल्डवरील अनुभव) किती दिले पाहिजेत हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी सरकार समोर मांडतील आणि या दोघांमधील चर्चेची मध्यस्थी भारतीय रिझर्व्ह बँक आणि सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, जनरल ऑफ पोलीस ट्रिब्यूनल यामध्ये असावेत. मग शेतकऱ्यांना किती दर मिळाला पाहिजे आणि सरकार शेतमालाचे दर कमी का देते? शेतमालावर कायम निर्यात बंदी का घालते? कायदे कोण मोडते आणि सरकारला कायद्याने वागायला शेतकरी संघटना का सांगते याचे उत्तर मिळेल.

## नविन केंद्र सरकारने तोट्यातील आधारभूत किमतीचे भूत पुन्हा शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसविले !



## संपादकीय...
### विठ्ठलराव पवार

सरकारच शेतकऱ्यांना कायद्याप्रमाणे वेळेवर शेतमालाचे पैसे देत नाही, शेतीला वेळेवर कर्ज देत नाही, शेतमाला वेळेवर निर्यात करत नाही (उदा. शुगरकेन कंट्रोल ऑर्डर १९६६ प्रमाणे शेतकऱ्यांना १४ दिवसात ऊसाचे संपूर्ण पैसे देणे बंधनकारक असताना सरकार त्यांना ३ वर्षे पैसे देत नाही. या कायद्याचा भंग केला म्हणून अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ७ व १० अनुसार सरकार पोलिस, संबंधीत सर्वच साखर कारखान्यांवर एफआयआर दाखल का करत नाही? आजपर्यंत असे किती गुन्हे दाखल केले? हे कायदे सरकार पाळत नाही म्हणून शेतकरी संघटना महाराष्ट्र सरकार कायदे पायदळी तुडविते म्हणून शेतकरी संघटना कायदा हातात घेते यात चुका काय? वर मी म्हटल्याप्रमाणे पेट्रोल, डिझेल, रॉकेल, गॅसच्या किमंती सरकार ५ ते ५० रूपये एकाच वेळी वाढवते, याबद्दल आमचे दुमत असण्याचे कारण नाही पण सरकारमधील विरोधी पक्षनेते शेतकऱ्यांची बाजू घेण्याऐवजी गोरगरिब मजुरांना, मजबूर लोकांना चवन्नी, अठ्ठणी देऊन रस्त्यावर उतरवितात, रस्ते अडवितात, आंदोलने करतात, पुतळे जाळतात, त्यावेळी ५ ते ५० रूपयांनी वाढविलेले दर सरकार ७२ पैशांपासून ५ पैशापर्यंत कमी करते आणि विरोधी पक्ष टेबल वाजवून आनंद व्यक्त करतात? तर त्यांचे मागे फिरणारे लाचार लोक पुढच्या आंदोलनाची वाट पाहतात. सरकार आणि विरोधी पक्षाची देशाला प्रगती पथावर नेण्याची लक्षणे आहेत का? सरकार आणि विरोधी पक्ष एकच आहेत ते शेतकऱ्यांच्या वा गोरगरीबांच्या हिताचा विचार करणारे नाहीत. आंदोलने करून पेट्रोल, डिझेल, रॉकेलचे दर कधीच कमी होणार नाहीत तर त्यासाठी इथेनॉल हा पर्याय आहे, शेतकऱ्यांच्या शेतमालापासून (ऊसपासूनची मळी, धान्यमका, फळे यापासून दारूऐवजी) इथेनॉल मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकते ते वरील पेट्रोलियम पदार्थांमध्ये मिक्स केल्यास आणि त्याला पेट्रोल इतकाच बेसिक दर (५५ रू) दिल्यास पेट्रोलियम पदार्थांचा दर ३० रूपयाने कमी होईल, प्रदूषणही होणार होईल आणि मोठी बाजारपेठ उपलब्ध होऊन शेतमालाला रास्त दर तर मिळेलच आणि सरकारचा पडलेला रूपयादेखील वधारेल यात शंका नाही. आज भारत देशामध्ये कायदेशीर आंदोलन करणारी फक्त शेतकरी संघटना आहे हे सांगताना मला देखील अभिमान वाटतो आणि आहे. सरकार मात्र कायदे मोडते आणि शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करते, हा सरकारचा गुन्हा आहे, याबाबत माझी पत्रकार बांधवांना विनंती आहे की, उगाच कोथींबीर, पालेभाज्या, धान्य, साखर, महाग झाली की कडू बातम्या लावून शेतकऱ्यांना दुबळे बनविण्याचा लिखीत्र प्रयत्न करू नका? प्रत्यक्ष व्यवहार समोर मांडा मग काय ते सत्य बाहेर येईल. सरकार जर उत्पादन खर्चाच्या ५२% उणे दर शेतकऱ्यांना द्यायला लागले तर शेतकरी १२५% कर्ज फेडू शकेल का? ही एका वर्षाची त्सुनामी असेल तर मी देखील समजू शकतो पण शेतकऱ्यांसाठी प्रत्येक वर्षी ही सरकारी त्सुनामी आणि आस्मानी संकट कायमचेच आहे. केंद्रशासनामार्फत २०१४-१५ साठी किमान आधारभूत शेतमालाच्या ज्या किमती जाहीर केल्यात तो शेतकऱ्यांच्या कष्टावर घातलेला घाला आहे. रास्त दरवाढ देण्यापेक्षा त्यांच्या जखमेवर सरकारने मीठ चोळले आहे म्हणून हा संताप आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही, तो अधिकार सरकारला. मग शेतकऱ्यांच्या मतांचा जोगवा मागुन निवडून गेलेले खासदार संसदेत काय झोपा काढतात की हे देखील त्यांच्यातच सामील होतात असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. सरकारने खरीपांसाठी जाहीर केलेला दर शेतकऱ्यांना मिळतो का? हे सरकार, केंद्र सरकार छातीठोकपणे मान्य करेल का? दर जाहीर केले हे चांगले पण जाहीर केलेल्या दरापेक्षा उत्पादक शेतकऱ्यांना कमी दर देणाऱ्या व्यापारी दलाल, बाजार समित्यांची लेखी तक्रार करा असे सरकारचे परिपत्रक देखील निघाले. माझा प्रश्न आहे की याबाबत झालेल्या तक्रारीवर आजपर्यंत सरकारने काय कारवाई केली? उदा. सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांचे १ कोटी ९ लाख रूपये बेकायदेशीरपणे कपात केले त्याचा निर्णय (निकाल) झाला पण? शेतकऱ्यांना ती रक्कम मिळाली का? मी स्वतः विठ्ठल पवार, गोरक्षनाथ घाडगे आदी शेतकऱ्यांनी हा निकाल तत्कालिन केंद्रीय कृषीमंत्री साहेबांना २३ जून २०१२ रोजी पुणे सर्कीट हाऊस येथे झालेल्या सविस्तर चर्चेत दिला. त्यावेळी सांगोली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्वेसर्वा माजी कृषीमंत्री, आमदार गणपतराव देशमुख पुत्रांसह उपस्थित होते. भारत भालके, दिपकआबा पाटील, मंत्री रामराजे नाईक निंबाळकर हे देखील या बैठकीला उपस्थित होते. पोलिस अधिकारी, प्रशासन देखील होते. तरी देखील शेतकऱ्यांना अद्याप १ कोटी ९ लाख रूपये परत मिळाले नाहीत. मग कायदे पायदळी कोण तुडविते? शेतकरी संगटनेने ५ जुलै २०१२ ला लबाड सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या घरावर मोर्चा काढला तो बेकायदेशीर कसा? सहकार मंत्री या घराचे सरकारी भाडे व सरकारी भत्ता घेतात. भांडारकर रोड मनाली अपार्टमेंटमध्ये त्यांचे सहकार खात्याचे खाजगी सचिव कार्यालय आहे. मग हे हर्षवर्धन पाटील यांचे खाजगी घर कसे? १ हजार पोलिस, १५० अधिकारी आमच्या भोवताली, ५ दिवस आम्ही कोंबींगमध्ये. ५५ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे ऊस दर ठरलेली रक्कम दुसरा हप्ता अंतिम - दिली नाहीत. शेतकरी संघटना त्यांचेसह राज्य सरकारला दोन महिने अगोदरपासून सांगत आहे. तरी पैसे देत नाहीत. कित्येक साखर कारखान्यांनी तर अंतिम रूपया देखील शेतकऱ्यांना दिला नाही. मग पोलिस भावांनो कायदा कोणी मोडला? सरकारी अधिकारी भावांनो गुन्हा कोणावर दाखल करायला पाहिजे? १९६६ चा कायदा १९५५ च्या ७ व १० नुसार भंग केला म्हणून सहकार मंत्री, सरकार यांचेवर गुन्हा दाखल करावयाचा सोडून कायद्याने कष्टाचे पैसे मागणाऱ्या उत्पादकांवर, शेतकऱ्यांवर तुम्ही काठी उगारली. तुम्ही आजपर्यंत चोरांना घरापासून मंत्रालयापर्यंत संरक्षण दिले म्हणून सहकारी संस्थांचा लिलाव होतोय! मग तुम्ही देखील आरोपीच्या पिंजऱ्यात आहात हे विसरू नका? मी हा हिशोब कायदेशीरपणे मांडतोय. शेतकरी संघटना राष्ट्रपतींना भेटून सरकारला कायदे पाळायला सांगा असे साकडे घालते. यावर भारताच्या तत्कालिन राष्ट्रपतींनी (मा. प्रतिभाताई पाटील-१० जून २०१२) शेतकरी हा खरा उद्योजक आहे. उद्योजकाप्रमाणेच सर्व प्रकारच्या जोखीमा पत्करून त्यांना शेती करावी लागते, उद्योग आणि कृषी क्षेत्राने परस्परांबरोबर सहयोग करून उत्पादनाबरोबरच प्रक्रीया, संवर्धन, साठवणूक आणि विपणन यामध्ये एकमेकांना सहभागी करून घेतले पाहिजे, असे म्हटले होते. हे राज्य सरकारला अजून कळाले नाही का? तरीही सरकार कायदे पाळीत नाही. इंडस्ट्रीयल उद्योगांच्या उत्पादनांचे दर सरकार ठरवते का? मग शेतकऱ्यांच्या उत्पादीत केलेल्या शेतमालाच्या दरात सरकारची लुडबुड का? ती देखील तुटपुंजी ऊणे ५२% तोटा सांगा पत्रकार भावांनो शेतकरी आत्महत्या करील नाही तर काय? सरकारने जे १४-१५ साठी दर जाहीर केले यात ३० ते ४०% वाढ करावी. दरवर्षी त्यात १५ ते २०% वाढ करावी. सर्व शेतमालावरील निर्यात बंदी उठवावी. शेतमाल आयात धोरण अर्धा टक्क्यापेक्षा जास्त नसावे. १९४७ मध्ये रूपयांचे मुल्य १ रूपयाच होते. तो पडलेला नव्हता. आज स्वातंत्र्यानंतरच्या ६५ वर्षात प्रगती १००% व्हायला पाहिजे होती पण सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे ६४% भारत नंबर वन होण्याचे स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अरूण जेटली, पृथ्वीराज चव्हाण, अजितदादा पवार, कसे पाहतात? अशाने देश नंबर १ होईल का? याचे सरकार, शासन, प्रशासन यांनी आत्मचिंतन करावे.

**— विठ्ठलराव पवार**

प्रदेश कार्यकारिणी सदस्य शेतकरी, संघटना, तथा, सरचिटणीस

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विठ्ठलराव नामदेव पवार द्वारा चांगभलं क्रिएशन अॅन्ड पब्लिसिटी, नामवैभव, कर्णलपार्क, स.नं.३७/२/१/१, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११ ०३६. यांनी समर्थ प्रिंटर्स ५५५, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - ४११ ०३० येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. मो. नं. - ९४२२५१७०४४
जाहिरात प्रमुखःरविशंकर पवार, श्री.योगिराजः९८२२४९५९०४ कायदेशीर सल्लागार : अॅड. पांडुरंग ढोरेपाटील, अॅड. डी. के. पवार (माजी अॅडीशनल-जिल्हा व सत्र न्यायाधीश), काही वादविवाद- पुणे न्यायालयीन कक्षेत,

# संविधानात आर्थिक स्वातंत्र्याची पायमल्ली करणारा सत्तापदस्थांचा संघर्ष

मानवाचा आजपर्यंत जो विकास झाला, उपभोगाची जी प्रचंड साधने मनुष्याने निर्माण केली, त्याची निसर्गाच्या नियमानुसार मनुष्य समूहाच्या कोणत्या प्रेरणा कारणीभूत आहे?


वैज्ञानिक नियम आहे.

पहिले एक माणूस दुसऱ्या सारखा असू शकत नाही. म्हणजे प्रत्येक माणूस (नागरिक) समान नसून तो इतरांपेक्षा अनन्यसाधारण आहे. पण प्रत्येक नागरीक कायदयासमोर समान आहे असे संविधानात म्हटले आहे. प्रत्येक नागरीक समान आहे असे संविधानात कोठेच म्हटले नाही. हा नियम निसर्गनियमाविरूध्द नसून हया तत्वाचे कायदयाद्वारे सर्वांना लाभ व्हावा म्हणून त्याचे नियमन केले आहे.

दुसरा स्वार्थ ही मानवाच्या प्रगतीची तथा विकासाची प्रेरणा आहे. प्रत्येक नागरीकपरी प्रत्येकाच्या स्वार्थाचे प्रकार त्या त्या व्यक्तिपरत्वे सारखे असत नाही. सामाजिक अर्थकारण हे हया वैज्ञानिक तत्वावर अवलंबून आहे. म्हणून नागरीकांच्या इतर मुलभूत अधिकारांत आर्थिक स्वातंत्र्य महत्वाचे मानले गेले.

आता कायदयाच्या भाषेत हया आर्थिक स्वातंत्र्याच्या शब्दांत स्पष्टपणे मांडणी करण्यात आली. ते शब्द -''मालमत्ता बाळगणे हयाचे स्वातंत्र्य'' ''मालमत्ता मिळविणे याचे स्वातंत्र्य''

''मालमत्ता साठवून ठेवण्याचे स्वातंत्र्य'' आणि शेवटी ''मालमत्तेचे वितरण करणे याचे स्वातंत्र्य'' म्हणजे खरेदी करणे, विक्री करणे, उपभोग करणे याच्या संबंधी आहे. हे बाजारपेठेशी संबंधी आहे. म्हणजे बंधमुक्त बाजारपेठेचे स्वातंत्र्य हा त्याचा अर्थ आहे. हे निसर्ग नियमाच्या विरूध्द नाही. अशा स्वातंत्र्याच्या हक्काचे नियमन करण्यासाठी बरेच कायदे इंग्रजांच्या काळात बनविण्यात आले आहेत. अलीकडच्या काळात निसर्ग नियमाचा आधार पुढे आला आहे.



प्रत्येक सजीव प्राण्यात मन नावाची एक अदृष्ट यंत्रणा असते. आचारणाचे सारे नियंत्रण शरीराच्या काही अवयवांद्वारे व्यक्त होत असते.

मनातून निर्माण होणारी आचरणाची मनुष्यामध्ये नाक, कान आणि गळा ९(घसा) यामध्ये व्यक्त होत असतात. हया अवयवांची भूमिका फार महत्वाची मानली जाते.

नाकाला एखादया गोष्टीचा सुखावा लागला म्हणजे तिकडे कान दयावे कि देवू नये? कानाने एखादी गोष्ट ऐकली कि, बोलून दाखवावी की नाही? हयाचे भान त्या त्या व्यक्तिला असते. म्हणजे प्रत्येक व्यक्तिला स्वतःची संवेदन पटल मिळालेली असते. हया संवेदन पटलाच्या आधारे तो तो व्यक्ति निर्णय घेत असतो. हा निर्णय व्यक्तिपरत्वे वेगळा असू शकतो. हया संवेदन पटलाचा उल्लेख १२ जून २०१३ च्या दैनिक लोकसत्तेमध्ये शेतकरी चळवळीचे भिष्माचार्य मा. शरद जोशी यांनी केला होतो.

हया सर्व निसर्ग नियमाचा आधार घेवून २६ जानेवारी १९५० च्या आपल्या संविधानात आर्थिक स्वातंत्र्याचा मुलभूत हक्क मान्य करण्यांत आला होता.

म्हणून कायदा शाखेत एखादा कायदा तज्ञ कितीही पारंगत असलस तरी संविधानाची मोडतोड करून आर्थिक स्वातंत्र्य काढून बनविलेले कायदे व नियम हयाचे भिषण परिणाम काय झाले हयाचे आकलन त्या कायदेतज्ञाला असतेच असे नाही.

बरेच कायदेतज्ञ, अर्थतज्ञ म्हणून घेणारे हया मूलभूत आर्थिक स्वातंत्र्याला डावलून जी मांडणी करतात ती नैतिकतेच्या आधारे करतात. जी नैतिकता निसर्ग नियमाविरूध्द असते ती टिकावू असत नाही. म्हणून भारतीय अन्न महामंडळ, नियोजन आयोग, नाफेड ही महाकाय भ्रष्टाचारी कुरणे आर्थिक स्वातंत्र्य जर काढून घेतली तर निर्माण झाली नसती. हे ज्याला समजले तोच संविधानतज्ञ, तोच अर्थतज्ञ. निवळ कायदयाची पदवी घेवून काय कामाची.

सर्वोच न्यायालयाचा स.न.१९६७ चा गोलखनाथ खटला आणि स. न. १९७३ चा केशवानंद भारती खटला हे पाहणे म्हणूनच महत्वाचा आहे.

हयाच मोडतोड केलेल्या संविधानाचा आधार घेवून, आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे कायदे, परिशिष्ट - ९ च्या नळकांडीत कोंबले. हयाच संविधानाचा आधार घेवून मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या टोळीचा सत्तापदस्थांचा संघर्ष आजतागायत चालू आहे.


स.न.१९८० पासून सुरू झालेली शेतकरी चळवळीतले मोडतोड केलेल्या संविधानाचे हिंसक स्वरूप जगासमोर आणले नसते तर ते समोर आलेच नसते.

आत्ता आर्थिक स्वातंत्र्यावर फार काळ नियंत्रण ठेवणे सरकारी यंत्रणेला अशक्य होत आले आहे. हे एक सुचिन्ह.

**लेखनः ॲड. सुभाष खंडागळे**
**प्रकाशक : विठ्ठल पवार**

# वाढदिवसाचा खर्च टाळून पाठकसरांनी शाळेस भेट दिला पंखा !

बेलवाडी (रवि पवार) :- जंक्शन ता. इंदापूर येथील सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी महादेव पाठक यांनी आपल्या ६३ व्या वाढदिवसाचा अन्य बाबीवरील खर्च टाळून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस छतावरील पंखा भेट दिला. पाठक यांनी दिलेली भेट शाळेचे मुख्याध्यापक सुभाष कांबळे यांनी स्विकारली. शाळेस पंखा भेट देऊन सामाजिक बांधिलकी जपत, शिक्षण क्षेत्रावरील व गावच्या शाळेवरील प्रेम पाठक यांनी जोपासले याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. पाठक सहेबांचे आमच्या शाळेस वारंवार सहाय्य मिळते. वाढदिवसानिमित्त शिक्षणखाते व शाळेतील शिक्षक वर्गाच्या वतीने मुख्याध्यापकांनी पाठक यांचे



अभिष्टचिंतन केले. यावेळी केंद्रप्रमुख भिवा हगारे मख्याध्यापका सुभाष कांबळे शहाजी म्हेत्रे रहिमान सय्यद पौर्णिमा बनसोडे सुनिता यादव व रेश्मा थोरात आदी सहशिक्षक अंगणवाडी सेविका मदतनीस व पालक आदी उपस्थित होते.

# सन १४-१५ गळीत हंगामासाठी प्रति टन...

(पान १ वरून) रमेश चौधरी, सुभाष गायकवाड, लक्ष्मण गुणवरे, कौशल्या चांटे, गोरख घाडगे आदि कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात ऊसाचा प्रती टन उत्पादन खर्च ३५००/- रु. खर्चाचा तक्ता व त्यावर

एकरी ऊस उत्पादन खर्चाचा तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | ट्रॅक्टरद्वारे मशागत | ५१००.०० |
| २ | बैलाद्वारे होणारी मशागत | २५००.०० |
| ३ | रोजंदारी मजूर स्त्रिया | १३१००.०० |
| ४ | बी-बीयाने | ७०००.०० |
| ५ | सेंद्रीय खते | १३०००.०० |
| ६ | यंत्राद्वारे ऊस मशागत | ४०००.०० |
| ७ | रासायनिक खते | ११०९६.०० |
| ८ | सिंचन (पाणी, वीज बीले, दुरुस्ती) | ५५००.०० |
| ९ | जैविक व पोषक द्रव्ये | २७५०.०० |
| १० | तन नाशके | |
| ११ | जंतु नाशके | ९७०.०० |
| १२ | अनुषंगीक | ८४०.०० |
| १३ | विमा हप्ता | |
| | एकूण | ६५८५६.०० |
| १ | या खेळत्या भांडवलावरील व्याज | ७८००.०० |
| २ | जमिनीचा महसूल व उपकर | ८६०.०० |
| ३ | अवजारे, गोदामे, घसारा | ३००६.०० |
| ४ | जमिनीचा खंड, भाडेपट्टी | १५०००.०० |
| ५ | स्थिर भांडवलावरील व्याज | २१००.०० |
| ६ | कौटुंबिक मानवी श्रम | १४५००.०० |
| ७ | ऊस देखरेख खर्च | ९९००.०० |
| | एकुण १ एकर ऊसासाठी येणारा उत्पादन खर्च | ११९०२२.०० |

स्वामीनाथन समितीच्या शिफारशीप्रमाणे उत्पादन खर्च त्यावर ५० टक्के नफा द्यावा अशी मागणी साखर आयुक्त यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले व मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ३ जुलै रोजी यांना मुंबई येथील कार्यालयात ऊसदर ३५०० रु. उत्पादन खर्च + नफा अशी एफआरपी ऐवजी एमआरपी दरतक्ता जाहीर करावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. सदर बाबत ३१ जुलै पूर्वी निर्णय घेऊन १/९ पासून कारखाने सुरू केल्यास हंगाम एप्रिल १५ मध्ये वेळेवर संपेल तत्पूर्वी वरील निर्णय व निवेदनातील ६ मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती मुख्यमंत्री व साखर आयुक्त यांना करण्यात आली आहे.

# संपूर्ण राज्यावर शेती, पाणी, रोजगाराचे सकंटःविठ्ठल पवार

(पान १ वरून)

तर त्यामधून पुरशी विज निर्मिती होवू शकते व शेतीलाही मुबलक पाणी उपलब्ध होवू शकेल. निधी अभावी गेले अनेक वर्ष धरण बांधण्याची कामे रेंगाळत पडलेली आहे. म्हणून यासाठी खाजगी लोकांना (बी.ओ.टी) संधी देणे आवश्यक आहे. राज्यामध्ये अनेक लोक यामध्ये भांडवल गुंतवण्यास तयार होतील. त्यांना या कामासाठी राज्य सरकारने परवानगी द्यावी.

भारतात विज व पाणी याप्रमाणे काही वर्षापुर्वी टेलीफोनची सुविधा अत्यल्प होती. एक टेलीफोन मिळविण्यासाठी खासदाराचे पत्र घ्यावे लागायचे. त्यामुळे मोठी प्रतिक्षा यादी होती. सरकारने निरनिराळ्या खाजगी उद्योजकांना माहिती व दळणवळण क्षेत्रात प्रवेश दिल्यामुळे या क्षेत्रामध्ये दळणवळणाची क्रांती घडून आली. या स्पर्धेमुळे चांगल्या सुविधा निर्माण झाल्यामुळे टेलिफोनचे दरही अत्यंत कमी झाले. हा अनुभव आपण घेत आहोत. तेव्हा धरण पाणी विज याबाबतही असेच धोरण राबविल्यास विजेच्या व पाण्याच्या बाबतीत. महाराष्ट्रात विजेची व पाण्याची सुध्दा मुबलक प्रमाणात निर्मिती होईल. त्यामुळे स्पर्धा निर्माण होवू शकते. केंद्र व राज्य सरकारने या बाबत गांभीर्याने व महाराष्ट्रातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने निर्णय घ्यावा, म्हणून शरद जोशी प्रणेते शेतकरी संघटनेच्या वतीने सरकारला विनंती करण्यात येत असल्याचे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात विठ्ठल पवार यांनी म्हटले आहे.

# पोशींद्याच्या हितासाठी....घेतला कांदा हातात!

(पान १ वरून)

शेतमालाच्या आधारभूत किमंतीत दमडाही वाढविला नाही. केवळ साखर इम्पोट ड्युटी ती शेतकरी संघटनेची गेल्या २०/२५ वर्षापासूनची मागणी होती. तेवढी ४०% व इथेनॉल २०% ऐवजी १० टक्के या दोन वस्तूत वाढ केली पण यामुळे ७० टक्के शेतकऱ्यांना आधारभूत किमंतीत काहीच वाढ नरेंद्र मोदी सरकारने केली नाही, ती करावी.

कांदा जिवनावश्यक वस्तू कायद्यातून वगळा तर सर्व शेतमालक उत्पादन खर्चावर आधारित दर व त्यावर स्वाभिमान समितीचा शिफारशी प्रमाणे ५०% नफा, साखरेचा विक्री दर (१७% नागरीकरणासाठी) ३२% केंद्र सरकारच्या परीपत्रकाचे आदेश राज्यांना पारीत करावेत. उर्वरित साखरेचा दर इंडस्ट्रियल वापर म्हणून ४५% पेक्षा अधिकतेने व इथेनॉल साठी ४०% शुगरकेन वर बंधन घालून २०% इधनामध्ये वापरण्यास तात्काळ परवानगी द्यावी तसेच सन १४-१५ साठीच्या शेतमालांच्या आधारभूत किमंतीत १५ ते २० टक्के वाढ करून स्वाभिमानच्या शिफारशी प्रमाणे नफा द्यावा. सन १४-१५ साठी उसाचा पहिला ॲडव्हांस ३५००/- रू. जाहीर करावा. त्यावर स्वाभिमान समितीच्या शिफारशी प्रमाणे नफा द्यावा. आदी मागण्यांसाठी शेतकरी संघटनेचे प्रणेते मा. शरद जोशी, रवि देवांग, वामनराव चटप, गुणवंत पाटील, सरोजमाई काशिकर, संजय कोळे, विठ्ठलराव पवार, शैलज्या देशपांडे, अनिल घमवर, कैलास तंवर, सुधीर बिंदू, गंगाधर मुटे, समाधान कणखर, गुलाबसिंग सुर्यवंशी, उत्तमराव पावळे, प्रभाकर दिवे, महामुद पटेल, दिलीप भोयर, शिवाजी शिंदे, निवृत्ती कर्डक, श्रीकृष्ण दुमरिकर, संजय पानसे, अंजलीताई पातुरकर, हिराताई पवार, ताई हजारे, ज्योत्सना बहाले, सतिश देशमुख, सुनिल शेरवार, राजेंद्र ठाकूर, आनंद पवार, बाबुराव गोरजे, कडुआप्पा पाटील, शितल राजोबा, माधव मल्लेश, दिलीप भोयर, ॲड. दिनेश शर्मा आदी प्रमुखांच्या उपस्थितीत शेगांव जिल्हा बुलढाणा येथे झालेले राज्य कार्यकर्त्यांच्या बैठकीत वरील आंदोलनाचा निर्णय मा. शरद जोशी साहेब यांनी जाहिर केला.


**राज्यातील आंदोलनाची सुरूवात ४ ऑगस्ट नाशिक येथून होणार असून विभागांवर बैठका, - मिटींग २७ जुलै पर्यंत घेण्यात येणार आहेत.**

दिनांक २७ जुलैला इंदापूर येथे मेळाव्याचे आयोजन प्रवेश कार्याकारणी सदस्य विठ्ठलराव पवार, पुणे जिल्हा महिला आघाडी कार्याध्यक्षा हिराताई पवार, ताई हजारे, महादेव वाघमोड, आंबदास बाबर, लक्ष्मण गुणवरे, अनिल खाडे, विजय गायकवाड, निलेश दवेकर आदी कार्यकर्ते करणार असल्याचे विठ्ठल पवार यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# मनपात नव्याने ३४ गावे समावेश करण्यास शेतकरी संघटनेचा तीव्र विरोध आंदोलनाचा ईशारा



पुणे मनपा आयुक्त विकास देशमुखसाहेब यांना आंदोलनाचे निवेदन देताना शेतकरी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विठ्ठल पवार, कर्णल सी. आर. चितीबाबू (निवृत्त), रमेश चौधरी अजित काबडे, सौ. कौशल्या चाटे आदी कार्यकर्ते.



शेतकरी संघटनेला पुणे महानगरपालिकेचे पत्र

वालचंदनगर : ३४ गावांतील सर्वसामान्य मिळकतदार, रहिवाश्यांना विश्वासात न घेता, त्यांचे मत न आजमावता, त्यांच्या संमतीविना पुणे मनपात समाविष्ट करण्याच्या निर्णयाला, त्या सर्व गावकऱ्यासह शेतकरी संघटनेने हरकत घेतली आहे. त्यांना मनपात समावेश करण्यास तीव्र विरोध करीत २४ मे २०१४ च्या आदेश रद्दबातल करावे, अन्यथा आंदोलन छेडावे लागेल असा इशारा शेतकरी संघटनेचे प्रदेश सचिव विठ्ठल पवार यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला.

पवार आपल्या निवेदनात पुढे म्हणतात की, "केवळ बिल्डर लॉबीला हाताशी धरून काही पांढरपेशी पुढाऱ्यांनी स्वार्थांधतेने रचलेला कट असून ३४ गावातील सर्वसामान्य जनता नाहक भरडली जाणार आहे आणि भल्या मोठ्या नुकसानीसह गैरसुविधाला बळी पडणार आहे. उलट मनपा यंत्रणेवर ज्यादा भार वाढून सोईसुविधाची यंत्रणाच कोलमडून पडणार असल्याची जास्त शक्यता आहे. ३४ ग्रामपंचायतीचे समावेशास रितसर सकारात्मक ठराव पारित झाले नसून बनावट खोट्या स्वाक्षरीने ज्यांनी हा बेबनाव केला आहे असा आमचा कयास असून त्यांची गुप्तचर विभागाकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी करीत आहोत. गावांचा समावेश करण्यापूर्वी लोकप्रतिनिधी व जनतेचे मत अजमावण्यासाठी पूर्व नोटीस दिली नाही, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबतची हमी नाही, कार्यक्षमतेत तिप्पटीने वाढ करण्याचा विचार केला नाही, वाढणाऱ्या हजारो टन घनकचऱ्याच्या विल्हेवाटीची नियंत्रण कार्यक्षमता विचारात घेतली नाही, ग्रामपंचायतीची मुदत अजुन तीन वर्षे बाकी आहे याचा विचार केला नाही, याउलट ग्रामपंचायतीची दप्तरे गटविकास अधिकाऱ्याकरवी बेकायदेशीरपणे जमा करून लोकमतांचा अनादर करीत लोकशाहीचा अवमान करीत, बेकायदा कार्यवाही केली जात आहे, ग्रामसभेचे लोकप्रतिनिधीचे अधिकार हिरावून घेतले जात आहेत, याचा विचार करणे आवश्यक आहे. शेतकरी संघटनेचे व ३४ गावांतील सामान्य जनतेचे मनपाच्या या कार्यवाहीवर आक्षेप आहेत. विना परवानगी जप्त केलेली ३४ गावच्या ग्रामपंचायतीचे दप्त विनाशर्त त्वरित परत करून या सर्व आरोपींचे निराकरण १५ दिवसात करावे समाधन होईपर्यंत संघटनेचा हा लढा चालूच राहील कदाचित मनपावर ३४ गावातील शेतकऱ्यांवर आसूड मोर्चा काढण्याची वेळ येणार नाही याची नोंद घ्यावी असा कडक इशारा निवेदनाद्वारे पवारांनी दिला आहे.

## "ग्लोबल ॲग्रो फाउंडेशन योद्धा शेतकरी" पुरस्कारासाठी नावे पाठविण्याचे आव्हान

रत्न, विशेष सामाजिक कार्य आदी ११ पुरस्कार देण्यात येणार आहेत. सदर पुरस्काराचे वितरण दि. २७ रोजी इंदापूर येथे शेतकरी संघटनेचे खासदार व मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. ट्रॉफी, शाल, श्रीफळ, रोख रक्कम पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप असून, गेल्या १० वर्षात मा. लक्ष्मण वढले, डॉ. सौ. प्रतिमा इंगोले, सौ. दिप्ती चौधरी, मा. आण्णा हजारे, मा. राजेंद्र चव्हाण (आय. ए. एस.), मा. चंद्रकांत दळवी (आय. ए. एस.) मा. रमेश वांजळे, मा. पत्रकार अनिल सावळे, गणेश कोरे, गणेश आळंदीकर, हनुमंत पाटील, मा. फतूभाई रिक्षावाले आदींना पुरस्कार देण्यात आलेले आहेत. अधिक माहितीसाठी ८८०५४०१३१४ वर संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे सचिव राणा प्रेमजित सिंह पवार मा. संगीता पाटील यांनी पत्रकाव्दारे केले आहे.

## नको विठू राया अंत आता पाहू....

राहील कोरडे सर्व हे रान रे ...
भागीव तहान सर्वांची ...
कोरड रान पाहून आत्मा तळमळतो
काय घालू खाया या सृष्टीला
दया नाही सरकारला या अन्नदात्यांची
अडिवल पाणी साऱ्या पाटाच
काय होणार देवा गोरगरिबांच्या पोटाचं
नको विठू राया आम्हा सोन्याचांदीचे दान रे
एकदा भिजवून दे पांडुरंगा तहानलेले सर्व रान रे
नको पांडुरंगा अंत आता पाहू
भागिव तहान सर्वांची.....

- विठ्ठलराव पवार (संपादक)
(सदस्य प्रदेश कार्यकारिणी शेतकरी संघटना महा. राज्य)
मो. नं. - ०९४२२५१७०४४

## गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत उच्च न्यायालयात सुनावणी

पुणे - दुष्काळ आणि गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या कोणत्याही कर्ज वसुलीस स्थगिती असताना, काही बँकांनी कर्ज वसुली केल्याप्रकरणी आणि गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना ४२ हजार कोटी रूपये नुकसान भरपाई मिळावी, या शेतकरी संघटनांच्या मागणीवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

याबाबत माहिती देताना शेतकरी संघटनेचे सरचिटणीस विठ्ठल पवार म्हणाले, की गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने तुटपुंजी मदत दिली गेली. प्रत्यक्षात मात्र १७ लाख ६९ हजार ९०४ हेक्टर क्षेत्र गारपिटीने बाधित झाले होते. यामध्ये शेतकऱ्यांचे सुमारे ४० हजार कोटींचे नुकसान झाले होते. याबाबतची तक्रार उच्च न्यायालयाकडे करण्यात आली होती. तसेच गेल्या तीन वर्षांचा दुष्काळ आणि गारपिटीमुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत असताना शेतकऱ्यांच्या कोणत्याही कर्जाच्या वसुलीस उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असताना, कर्जाची वसुली होत आहे. या विरोधातदेखील अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेचीदेखील मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

## डेंगीमुळे केशवनगरमध्ये घबराटीचे वातावरण



केशवनगरमध्ये प्रचंड घाणीमुळे डास, व प्रचंड रोगराई पसरली आहे. आ. बाबर यांनी लाखो रुपयांच्या दिलेल्या औषध फवारणी मशिन गेल्या तरी कुठे? याची केशवनगरमधील नागरिकांमध्ये जोरदार चर्चा आहे.

वज्रमय शब्द व एकलव्य विचार असणारे एकमेव
www.punyymat.com
Email - nvithal.fams@gmail.com

साप्ताहिक

# पुण्यमत

पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रसिद्ध होणारे

• RNI.No.MAHMAR /2008/28522
• Decl. No. PHM/SR/188/2008

पुण्यमत



देहू ते पंढरपूर राष्ट्रसंत तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा

□ शुभेच्छुक □

विठ्ठलराव पवार - संपादक

शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य

ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन, बेलवडी, इंदापूर, पुणे व पवार परिवार


मुख्य संपादक
विठ्ठलराव पवार

• वर्ष १० • अंक ५० वा •
• गुरुवार दि. २६ जून ते २ जुलै २०१४ •

पाने ४
किंमत २ रुपये


# सहकार आयुक्तांनी शेतकरी जमीन लिलावाची व आत्महत्तेची घेतली गंभीर दखल; तात्काळ चौकशीचे आदेश

## विशेष वसुलीचे अधिकार काढून घ्या; आरबीआयचे गर्व्हनर राघुराम राजन यांचेकडे विठ्ठल पवार यांची तक्रार

वालचंदनगर : इंदापूर अर्बन बँकेने पठाणी पद्धतीने वसुलीपद्धत अवलंबत बावड्याचे दशरथ माने यांच्याकडील कर्जवसुली बेकायदेशीरपणे केली तर शिरूर तालुक्यातील शिरसगांवकाटाचे विकास मारुती चव्हाण यांनी कर्ज वसुलीच्या तगाद्यामुळे आत्महत्या केली या दोन्ही घटनांची सहकार आयुक्तांनी गंभीर दखल घेतल्याची माहिती शरद जोशीप्रणित शेतकरी संघटनेचे प्रदेशसचिव विठ्ठल पवार यांनी दिली.

इंदापूर तालुक्यातील बावड्याच्या दशरथ एकनाथ माने यांनी इंदापूर र्बन बँककडून २ लाख ३५ हजार रुपये कर्ज घेतले होते. त्या कर्जापोटी मानेनी २ लाख ९६ हजार रुपये परतफेड केली. बँकेने माने यांची ३० लाख रुपयांची जमीन अवघ्या ५ लाख ४३ "हजारांना २९/४/२०१४ रोजी न्यायालयाच्या कर्जवसुलीबाबतच्या आदेशाला हरताळ फासत बेकायदेशीरपणे दस्तऐवजाने विकली.


मुंबई उच्च न्यायालयाने गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारची शेती कर्जवसुली स्थगितीबाबत दिलेल्या आदेशाची पायमल्ली करीत अर्बनचे चेअरमन भरत शहा व संचालक मंडळाचे सदस्य कर्मचारी एम. डी. आदमाने, एस. की. चिनके, वाघ, दिवसे यांच्यासह बँकेचे सर्वेसर्वा सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांचा बडतर्फ करावे. दस्तऐवजात बदल करू नये व तपासकामात अडथळा होऊ नये म्हणून बँकेवर प्रशासक नेमावा अशी शेतकरी संघटनेने एका निवेदनाद्वारे सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था दिनेश ओऊळकर व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गर्व्हनर रघुरामराजन यांच्याकडे केल्याची माहिती प्रदेश सचिव विठ्ठल पवार यांनी दिली. ३१/१२/२०१४ पर्यंत गारपीटग्रस्त वा अन्य शेतकऱ्यांची कर्जवसुली करू नये असे शासन प्रशासन व बँका यांना मुंबई उच्च न्यायालयाने आदेश पारित केले असताना आदेशाची पायमल्ली करीत पठाणी पद्धतीचा अवलंब करीत बेकायदेशीरपणे कर्जवसुली करण्यात आल्याने अती शिघ्र तपास करून चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर संबंधितांना निलंबित ठेवावे व दोषीवर कडक कारवाई करावी अशी मागणी केली आहे. पुणे जिल्हा सहकारी बँकेचे वसुली अधिकारी शाखाधिकारी चव्हाण दाभाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख यांनी शिरसगांवकाटचोचा वकास मारुती चव्हाण यांना कर्ज ३१ मार्च २०१४ पर्यंत भरण्याचे व न भरल्यास घरदार जमीन याचा लिलाव करून तुला तुरुंगात टाकू असा वसुलीचा तगादा तगादा लावल्याने चव्हाण यांना आत्महत्येशिवाय पर्यायच उरला नसेल. शिरुचे तहसिलदार रघुनाथ पोटे व शिरुचे व. पो. नि. नारायण सारंगकर यांनी एफआयआर दाखल करून घेण्याबाबत केलेल्या टाळाटाळीमुळे उभयतांना निलंबित करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इंदापूर अर्बनच्या टॉप १०० ते ५०० थकित प्रकरणाच्या चौकशीचे आदेश द्यावेत, निष्पक्षपातीपणे दोन्ही बँकांची चौकशी करावी, दोन्ही बँकेवर प्रशासक नेमून संबंधितांवर बडतर्फीची कारवाई करून, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांना मंत्रीपदावरून पायउतार करावे अशीही शेतकरी संघटनेचे जोरदार मागणी केली आहे. अन्यायग्रस्त शेतकरी दशरथ माने यांना मंत्रीपदावरून पायउतार करोव अशीही शेतकरी संघटनेने जोरदार मागणी केली आहे. अन्यायग्रस्त शेतकरी दशरथ माने यांची जप्त वा विक्री केलेली मालमत्ता त्यांना परत द्यावी. आत्महत्याग्रस्त शेतकरी विकास चव्हाण यांच्या पत्नीस



पुणे जिल्हा बँकेत नोकरी द्यावी व दोन्ही लहान मुलास प्रत्येकी १० लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश द्यावेत अशीही मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. सहकार आयुक्तांनी या कर्जवसुली प्रकरणाची दखल घेतली असून वसुली अधिकाऱ्यांची बैठक बोलावून वसुली अधिकार काढून घेऊ व दोषीवर कडक कारवाई करू अन्यायग्रस्त कुटुंबियांना योग्य न्याय देऊ से आश्वासन दिले.

## शेतकरीविरोधी धोरण राबवाल तर रस्त्यावर उतरू - राजू शेट्टी

पुणे : आजपर्यंतच्या शेतकरीविरोधी धोरणामुळेच शेतकरी अडचणीत आला आहे. जर एनडीए सरकार शेतकरी धोरण मागील पानावरून पुढे सुरू ठेवणार असेल, तर आम्ही स्वस्थ बसणार नाही. त्याविरुद्ध आम्हाला नाइलाजाने रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी दिला.



कांदा-बटाट्याची दरवाढ रोखण्यासाठी नुकताच त्यांचा जीवनावश्यक वस्तूंमध्ये समावेश करण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. शेतकऱ्यांना चार पैसे मिळविण्याची संधी हिरावून घेणार असाल, तर आपला या निर्णयास विरोध राहील. तसे पत्रही आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कृषिमंत्र्यांना पाठविले आहे. मागील सरकारच्या काळात कृषिमूल्य आयोगाने घाईघाईने केलेल्या शिफारशींचे आकलन करून न घेता त्या जशाच्या तशा स्वीकारण्यात आल्या आहेत. त्यामध्ये कापूस आणि भाताच्या किंमतीत फक्त पन्नास रुपयांनी वाढ झाली आहे. सोयाबीन, भुईमूग आणि मक्याच्या किंमतीत वाढ झालेली नाही. गेल्या वर्षभरात शेतीचा उत्पादनखर्च पंधरा ते सोळा रुपयांनी वाढला आहे, तर आधारभूत किंमतीत केवळ एक

(पान ३वर)

## पणन संचालक डॉ. सुभाष माने यांची बदली रद्द करा; अन्यथा शेतकरी संघटनेचा आसूड मोर्चा

पुणे : महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारीवर योग्य निर्णय घेतलेल्या पणन संचालक डॉ. सुभाष माने यांची पणन कृषी व सहकार मंत्र्यांनी सहसचिवाकरवी सूडबुद्धीने केलेली बदली रद्द करावी, याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करीत सर्व शेतकरी व शरद जोशीप्रणित शेतकरी संघटना यांनी मागणी केली असून बदली रद्द न झाल्यास आसूड मोर्चाही काढणार असल्याचा ईशारा जाहीर प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिल्याचे शेतकरी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विठ्ठल पवार यांनी सांगितले आहे.

राज्यात सुमारे ३०० कृषी उत्पन्न बाजार समित्या असून बहुतांश बाजार समित्यात आर्थिक घोटाळे झालेबाबत तक्रारीवरून प्रथमदर्शनी दिसले. गेली अनेक वर्षे 'त्या' मंत्र्यांनी जाणुनबुजून



पणन सह संचालक यांना निवेदन देताना विठ्ठल पवार

या खात्याला पूर्णवेळ पणन संचालक सुडबुद्धीने मिळु दिला नाही. डेप्युटेशन डिपार्टमेंटमध्ये गेली ४ वर्षे कार्यरत असणारे डॉ. सुभाष माने यांना 'मॅट' मधूनच गेल्या ३ महिन्यापूर्वी 'पणन संचालकपदी' नियुक्ती करण्यात आली होती. माने यांच्या नियुक्तीपूर्वी मुंबई

(पान ३ वर)

# संपादकीय...

विठ्ठलराव पवार

## विशेष संपादकीय - मा. अमर हबीब

## फक्त गळफास तेवढा काढा !

शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी काय करायला हवे? हा प्रश्न वारंवार विचारला जातो. अशा प्रश्नांच्या उत्तराचे सूत्र फार वर्षापूर्वी महात्मा गांधी यांनी दिले होते. ते म्हणाले होते, की आमच्या सुधारणेसाठी तुम्ही काही करण्याची गरज नाही. तुम्ही आमच्या उरावरून उतरा. पुढे आमचे आम्ही पाहून घेऊ. शेतकऱ्यांच्या सुधारणांबद्दल हे उत्तर तंतोतंत लागू पडते. शेतकरी संघटनेने त्याचा खुलासा करताना गरिबी हटविण्यासाठी काही करण्याची गरज नाही. गरिबी वाढविण्यासाठी जे तुम्ही प्रयत्न करीत आहात तेवढे थांबवा, असे म्हटले होते. बऱ्याच लोकांचा अजूनही असा समज आहे, की सरकार हे मायबाप आहे. जनता त्याचे लेकरू. आई-वडील जसे आपल्या अपत्याची काळजी घेतात, तसे सरकार प्रजेची काळजी घेते. सरकार गरिबी वाढविते, शेतकऱ्यांना नागविते, यावर ते विश्वास ठेवायला तयार नसतात. कधी काळी शेतकरी आपल्या दुर्दशेचे कारण नशीब मानत. बरेच जण आता तसे मानत नसले, तरी त्यांचा शासन संस्थेबद्दलचा विश्वास मात्र ढळलेला नाही. आत्मविश्वास गमावलेला समाज उद्धारकांची वाट पाहत बसतो. लोकांना वाटते कोणी तरी येईल आणि आपले सगळे पांग फेडेल. याच मानसिकतेमुळे लोक सरकारकडे डोळे लावून बसलेले असतात. सरकार योजनांचे चार थेंब शिंपडते. कधी तरी मोठा पाऊस येईल, अशी आशा निर्माण करते. शेतकरी सरकारी आकाशाकडे डोळे लावून बसतात. पुन्हा कधी तरी चार थेंब शिंपडले जातात. शेतकऱ्यांच्या आयुष्यातला दुष्काळ मात्र हटत नाही. उपायांची दिशा कोणती? सरकारला हे करा सांगण्यापेक्षा हे करू नका सांगावे लागेल. अलीकडचे उदाहरण द्यायचे झाले, तर कांद्याचे देता येईल. देशी बाजारात कांद्याचे दर वाढत होते तेव्हा सरकारने निर्यातदराची मर्यादा वाढविण्याचा निर्णय केला. या दराने जगातील अन्य देशांत कांदा विकणे केवळ अशक्य झाले. कांदा हा शेतमाल. तो कोणत्या दराने विकावा हे कोण ठरविणार? सरकारने त्यात लुडबूड का करावी? शेतमालाच्या बाजारात सरकारची लुडबूड हीच खरी समस्या आहे. अर्थशास्त्रात मागणी आणि पुरवठ्याचा सिद्धांत शिकविला जातो. तुटवडा असेल, तर किंमत वाढ व विपुलता असेल, तर किंमत कमी अथवा मागणी वाढली, तर किंमत वाढ व मागणी घटली,तर किंमती कोसळतात. सरकार यात हस्तक्षेप करते. तोही अर्धा. जेव्हा बाजारात किंमती वाढायला लागतात तेव्हा नेमके अडविले जाते आणि जेव्हा किंमती कोसळतात तेव्हा सरकार गुमान गप्प. सरकारी हस्तक्षेप शेतकऱ्यांना मारण्यापुरताच केला जातो.

सरकारला शेतमालाच्या बाजारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार जीवनावश्यक वस्तू कायद्याने मिळतो. हा कायदा घटनेच्या ९ व्या परिशिष्टात आहे. न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर. घटनेचे ९ वे परिशिष्ट मूळ घटनेत नव्हते. ते नंतर जोडण्यात आले. का? मूळ घटनेत मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकार होता. या अधिकारामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण करता येत नव्हत्या. न्यायालय सरकारच्या विरुद्ध आणि शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल देत होते. सरकारने शक्कल काढली. त्यांनी घटनेला एक असे परिशिष्ट जोडले, ज्यात समाविष्ट झालेले कायदे न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर राहतील. सर्वांत पहिल्यांदा जमीन अधिग्रहणाचा कायदा ९ व्या परिशिष्टात टाकण्यात आला. कोर्टात जाऊन दाद मागण्याची संधी हिरावून घेण्यात आली. कालांतराने मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकारातून वगळण्यात आला. सिलिंगचा कायदा आला. या कायद्याने शेतकऱ्याने किती जमीन मालकीची ठेवावी,यावर मर्यादा घातली. हा कायदा पक्षपात करणारा होता. शेतकऱ्यांवर निर्बंध कारखानदारावर का नाही? असा प्रश्न विचारून कोणी कोर्टात गेले असते, तर हा कायदा रद्द झाला असता. या भीतीने तोही परिशिष्ट ९ मध्ये टाकला. कारखानदारी वाढावी. त्यासाठी स्वस्त मजूर मिळावेत. मजूर स्वस्त मिळण्यासाठी अन्नधान्याच्या किमती खालच्या पातळीवर ठेवण्यात आल्या. केवळ अन्नधान्य नियंत्रित करता येत नसल्यामुळे सगळ्याच शेतमालाचे भाव खालच्या पातळीवर राहतील, असे धोरण स्वीकारण्यात आले. ते धोरण राबविण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले. त्या कायद्यांना कोणी आव्हान देऊ नये म्हणून घटनेत नवे परिशिष्ट जोडण्यात आले. जोपर्यंत वे परिशिष्ट आहे, तोपर्यंत शेतकरी विरोधी कायद्यांना धक्का लावता येत नाही. जोपर्यंत हे कायदे अस्तित्वात राहतील तोपर्यंत शेतकऱ्यांसाठी कोणी काहीही केले, तरी त्याचा उपयोग होत नाही. गळफास लागलेल्या माणसाला कोणी म्हणाले, ममी तुझी सेवा करतो, हात पाय चोपून देतो, पाठीला मालिश करतो, तूप पोळी खाऊ घालतो. तर तो माणूस म्हणेल, त्याचे नंतर बघू आधी गळफास काढा: सरकार शेतकऱ्यांसाठी सगळे करायला तयार असते, पण गळफास मात्र काढीत नाही. मग प्रश्न पडतो सरकारला शेतकऱ्यांचे खरेच भले व्हावे वाटते का?

# शेतकऱ्यांनो संघटित व्हा!



महाराष्ट्र राज्यात खानदेश, विदर्भ, मराठवाडा, सातारा, सांगली, अहमदनगर इत्यादी जिल्ह्यांमधून २०१३ मध्ये दुष्काळाने उग्ररूप धारण केले होते. हा दुष्काळ मनुष्यनिर्मित होता. कारण लोक व लोकनियुक्त सरकार व विरोध पक्षांतील प्रतिनिधींनी जलसंधारणासाठी पुरेशी काळजी घेतली नाही. त्याचाच परिणाम म्हणजे हा दुष्काळ. यंदा पुन्हा पाऊस कमी पडणार, अशी भाकिते आहेत. एप्रिल महिन्यापासून विहिरी आटू लागल्या. पाण्याची पातळी मे महिन्यानंतर तळ गाठेल. तळपत्या उन्हाने पारा आताच ४०-४२ डिग्रीच्या पुढे सरकला आहे. तर पाण्याविना सामान्य जनतेचे जगणे मुश्कील झाले आहे. निवडणुकीच्या प्रचारातसुद्धा दुष्काळाचे राजकारण झाले, मात्र पाणी व शेती व्यवसायाचे भवितव्य काय, याविषयी कुणालाही स्पष्टता नव्हती.

महात्मा जोतिराव फुले यांनी १८८३ च्या भीषण दुष्काळात 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही घोषणा केली. गेल्या तीन दशकांत डॉ. स्वामीनाथन यांच्या कमिटीने दुष्काळावर मात करून शेती फुलविणाऱ्या योजनांबद्दल व त्यासाठी सरकार व बँकांनी काय केले पाहिजे? याबद्दल बहुमोल शिफारशी केल्या. केंद्र व राज्य सरकार छोटे व अल्पभूधारक शेतकरी यांच्याबद्दल फारसे काही करताना दिसत नाही.


अण्णा हजारे, पोपटराव पवार यांनी आपापल्या दुष्काळी गावांमधून पाणी अडवा, पाणी जिरवाज चे कार्यक्रम, जलसंधारणाच्या अन्य योजना यशस्वीरित्या राबवताना गावातील कष्टकरी जनता व तरूणाईला एकवटले. त्यामुळे दुष्काळतला त्यांनी आपल्या गावातून हद्दपार केले.

महाराष्ट्रातील सर्व दुष्काळी गावांमधून हे कार्यक्रम प्रत्येक पावसाळ्यापूर्वी गावातील लोकांनी, पंचायत सदस्यांनी, सरपंचांनी सर्व दुष्काळी गावांमधून ताबडतोब हाती घेतल्यास यंदा कमी पाऊस आला तरी जलसंधारणाचे काम केल्यास शेतीसाठी पाणी व पिण्याच्या पाण्याची तजवीज होऊ शकेल. राज्य सरकारने टँकर अथवा रेल्वे वॅगनमधून गावांना पाणीपुरवठा करणे ही लाजीरवाणी बाब टाळायची असेल तर जनतेचाच पुढाकार गावोगावी हवा शिरपूर पॅटर्नप्रमाणे ठिकठिकाणी बंधारे बांधणे ही कामे तातडीने व्हायला हवीत.

मानवनिर्मित दुष्काळाचा व पाणीटंचाईचा सामना करावयाचा झाल्यास दुष्काळावर भाषण करून काही साध्य होणार नाही, संघटित कामगार वर्गाने असंघटित शेतमजूर व किसान सभांसारख्या शेतकरी संघटना यांच्याशी भ्रातृभाव दाखवून महागाई, बेकारी व सर्वांना पेन्शन मिळाले पाहिजे. या प्रश्नावर २० व २१ फेब्रुवारी २०१३ रोजी दोन दिवसाचा अखिल भारतीय संप व संघर्ष केला. तोच भ्रातृभाव दाखवून गावागावांत संयुक्त प्रयत्नाने पाण्याच्या प्रश्न काही प्रमाणात सोडविण्याचा प्रयत्न केल्यास एक चांगला पायंडा पडू शकतो. पाणी अडवा, पाणी जिरवा हे सातत्याने उपक्रम गावातील तरूणाईने हाती घ्यावेत. जसंधारणाने शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. जलसंधारणाचे कार्यक्रम जर नीटपणे राबविले तर पावसाच्या पाण्यावरील पीक घेतल्यानंतर अजून एक किंवा दोन पिके घेण्याचे धैर्य महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळेल. जलसंधारणाचे कार्यक्रम नीट राबविले तर अल्पभूधारक कोरडा वाहू शेतकरी ठिबक सिंचनाने शेतीला पाणी पुरवठ्याचा विचार करू शकतील. जलसंधारणाच्या प्रोजेक्टकरिता, ठिबक सिंचनाच्या प्रोजेक्टकरिता प्रादेशिक ग्रामीण बँक, राष्ट्रीयकृत बँका, नाबार्डसारख्या वित्तसंस्था निश्चितच पतपुरवठा करू शकतात.

किंबहुना शेतकऱ्यांनी आपले सातबारा उतारे कोरे करण्याचा प्रयत्न करून वरील उद्दिष्टांकरिता बँकांकडे कर्ज मागणे आवश्यक आहे. महाराष्ट सरकारच्या योजना व बँकांच्या पतपुरवठ्याच्या योजनांचा कोरडवाहू शेतकऱ्यांनी लाभ घेण्याकरिता गावोगावी किसान सभा व बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी एकजुटीने पुढाकार घेतला पाहिजे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार अग्रक्रमाने शेतीसाठी १८ टक्के अधिक रक्कम बँकांनी कर्ज रूपाने द्यावी, हे स्पष्ट केले आहे. सामान्य कोरडवाहू शेतकऱ्यांनी अधिक संघटित होऊन बँकांकडे १८ टक्क्यांतील अधिकाधिक कर्ज जलसंधारण व ठिबक सिंचनच्या प्रकल्पाकरिता मिळवावे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील वीजपुरवठ्याची विजेच्या बिलाची स्थिती अत्यंत भयावह आहे. याला पर्याय म्हणून गावोगावी सौरऊर्जेवर चालणारी आधुनिक यंत्रसामग्री, वापरण्याची हिंमत शेतकऱ्यांनी स्वतःमध्ये निर्माण करावी. केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकारच्या योजनांप्रमाणे सौरऊर्जेच्या वापराकरिता मोठी सबसिडी मिळते. बँकांच्या योजना व सरकारच्या योजनांचा कल्पकरीत्या वापर करण्यासाठी दुष्काळ निवारण्याच्या तयारीसाठी जलसंधारण, ठिबक सिंचन किंवा उपसा सिंचन आणि सौरऊर्जेचा वापर करून पावसाच्या पाण्यावरील एक पीक घेऊन पुढील पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःगावपातळीवर संघटित झाल्यास त्याच्या आयुष्यात परिणामकरित्या बदल घडू शकतो. नव्हे तो घडविण्यासाठीच सरकार व बँकांचा कल्पकतेने उपयोग केला पाहिजे. १ मेच्या कामगार दिनाच्या निमित्ताने कामगार, शेतकऱ्यांनी नव्याने विचार करावा.

# व्यायामाचा कंटाळा नको!



सिगारेट पिण्याचे दुष्परिणाम सगळेच जाणतात; पण लोकांना हे माहीत नसते की, एक पाकीट सिगारेट पिण्याने जितके नुकसान होते त्यापेक्षा अधिक नुकसान एक आठवडा व्यायाम न करण्याने होते. यासाठी आठवड्यातून कमीत कमी चार दिवस किमान ४५ मिनिटे व्यायाम जरूर करा.

आजारांपासून बचाव होतो : व्यायाम आजारांपासून बचाव करण्यात प्रमुख भूमिका बजावतो. यामुळे तुमच्या शरीराच्या हालचाली होतात. जेव्हा तुम्ही व्यायाम करता तेव्हा संपूर्ण शरीर गतिमान होते. त्यामुळे शरीर चांगलेच राहते. व्यायामामुळे हृदयाचे आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह अशा आजारांपासून बचाव होतो.

प्रतिकारशक्ती वाढते : जर तुम्ही व्यायाम करत असाल तर शरीराला ऊर्जेची गरज असते. ॲरोबिक व्यायामामध्ये हालचालींबरोबरच शारीरिक व्यायाम जास्त होतो. उदा. सायकलिंग, वॉकिंग इत्यादी. यामुळे तुमचा स्टॅमिनाही वाढतो.

मसल्स बिल्डिंग : वेट ट्रेनिंगसारख्या व्यायाम मसल्ससाठी जरुरी आहे. यामुळे लिगामेंट आणि हाडांना याचा फायदा होतो. यामुळे तुमचा पॉश्चर, मसल्स जास्त सुधारतात.

लवचीकता : चांगल्या पॉश्चरसाठी स्ट्रेचिंगची आवश्यकता आहे. यामुळे शरीराची लवचीकता वाढते. तुम्ही पाहिजे तसे शरीर वाकवू शकता. लवचीकतेमुळे शरीराला इजा होण्याचा धोका कमी असतो.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विठ्ठलराव नामदेव पवार द्वारा चांगभलं क्रिएशन ॲन्ड पब्लिसिटी,नामवैभव, कर्णलपार्क, स.नं.३७/२/१/१, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११ ०३६. यांनी समर्थ प्रिंटर्स ५५५, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - ४११ ०३० येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. मो. नं. - ९४२२५१७०४४ जाहिरात प्रमुखःरविशंकर पवार,श्री.योगिराजः९८२२४९५९०४ कायदेशीर सल्लागार : ॲड. पांडुरंग ढोरेपाटील, ॲड. डी. के. पवार (माजी ॲडीशनल जिल्हा व सत्र न्यायाधीश), काही वादविवाद- पुणे न्यायालयीन कक्षेत.

# गोमूत्राचे औषधी उपयोग

गोमुत्रात अनेक औषधी गुण असतात. परंतु गाय साफसुथरी चांगला चारा खाणारी, स्वच्छ पाणी पिणारी आणि स्वस्थ हवी.

गोमुत्र हे तांब्याच्या किंवा पितळाच्या भांड्यात ठेवू नये. मातीच्या किंवा काचेच्या पात्रात ठेवावे. गोमुत्र हे एकावेळी ३० मिली घेता येते. ते दिवसातून एक दोन वेळा घ्यावे. त्यामुळे मलनिस्सारण होवून आतील आतडी साफ होतात. गोमुत्र हे परमरसायन बल व बुध्दीकारक द्रव्य आहे. ते आयु प्रदान करणारे असून रक्त विकार दूर करणारे व कफ वात पित्त यांना दूर करणारे अद्भूत औषध आहे. गोमुत्र हे तेज, गरम क्षार कडू लवण लघु अग्नीदिपन, त्रिदोषनाशक असते.

**पोटात दुखणे, वायुगोळा पोटाचे अन्य रोग :**

खाज खुजली, नेत्र व मूत्ररोगांना नष्ट करण्यास सहायक आहे.

खोकला, खास रोग, सूज, कान



दुखणे, कावीळ, अतिसार या रोगांत गोमूत्राचा लाभप्रद असतो. तसेच गोमुत्रात किटाणू नष्ट करण्याची चमत्कारी शक्ती असते. गो मुत्रात सर्वच आवश्यक तत्व आहे. गोमुत्र सर्व शरीराची रोगप्रतिबंधक शक्ती वाढवून रोगानां नाश करण्याची क्षमता प्रदान करतात. बाहयरूपाने गोमुत्राचा प्रयोग खाज, खुजली, चर्मरोग आणि सुज यात केला जातो. खोकला, सर्दी पडसे यात स्वच्छ कपडयाने गाळून ४ ते ५ वेळेस कपभर गोमुत्र प्यावे.

लहान मुलांनाही गोमुत्रात हळद घालून पाजावे. २५ ग्रॅम गाळलेले गोमुत्र रोज घेतल्यास भूक वाढते व शक्ती निर्माण होते. कोमट गोमुत्राचे थेंब कानात टाकल्यास कानाचे दुखणे ही कमी होते. संधीवातासाठी गोमुत्र हे अतिशय गुणकारी आहे. १० ग्रॅम एरंडेल तेल व २५ ग्रॅम गोमुत्र घेतल्यास किंवा अंगाला लावल्यास संधीवात कमी होतो. असे हे गोमुत्र गुणकारी व आरोग्याला प्रभावशाली आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे गोमुत्र हे मानवाला लाभलेली जल संजीवनीच आहे.

# पणन संचालक डॉ. सुभाष माने यांची बदली रद्द करा; अन्यथा शेतकरी संघटनेचा आसूड मोर्चा

(पान १ वरून)

कृषी उत्पन्न बाजार समितीसह इंदापूर बारामती सोलापूर सांगोला पुणे बीड लातूर लासलगांव नाशिक वाशी आदी कृषी उत्पन्न बाजार समित्यामधील भ्रष्टाचाराबाबत व आर्थिक घोटाळ्याबाबत असंख्य शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या असून त्याबाबत चौकशीची जोरदार मागणी करण्यात आली होती. पूर्णवेळ पणन संचालक नसल्याने तक्रारीच्या तपासाची कार्यवाही बराच काळ प्रलंबित राहिली होती. नव्याने पूर्णवेळ पणन संचालकपदी रूजू झालेल्या डॉ. सुभाष माने यांनी तक्रारीची सत्यता, पुराव्यांची पडताळणी व तपासणी करून केली असता मंत्र्यांच्याच हितसंबंधातील कृषी उत्पन्न बाजार समित्यातील संचालकांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न होऊ लागले. पणन संचालकांनी आर्थिक गैरव्यवहाराबाबत कारवाई केल्यास समितीच्या नातेवाईक संचालकासह मंत्रीदेखील आडकतील या भितीने कारवाईवर पणन मंत्र्यांनी स्टे दिला परंतु दिलेला स्टे बेकायदेशीर आहे हे लक्षात येताच पणन सहसचिव क. कि. पारकर यांचेकरवी सूडबुद्धीने व भितीपोटी डॉ. सुभाष माने यांची बदली आदेश काढून त्यांनी केलेल्या कारवाईची कागदपत्र व तपास पुरावे मंत्रालयीन अधिकारी पाठवुन हस्तगत करण्याच्या जोरदार हलचाली चालू झाल्या. संशयित शक्यतेने ते नष्ट होण्याची भिती व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहचविणारी घटना असल्याने उच्च न्यायालयाने त्वरित दखल घेऊन डॉ. सुभाष मानेची बदली रद्द आदेश व्हावा, संपूर्ण घटनेसह आर्थिक घोटाळ्याची न्यायालयाच्या आदेशाने सी. बी. आय कडे तपास चौकशीचे काम सोपवावे, दोषी व्यक्तीवर कडक कारवाई व्हावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत पणन सहकार व कृषी या तीनही मंत्र्यांना मंत्रीमंडळातून काढून टाकावे व बाजार समितीच्या संचालकाकडून शेतकऱ्यांची होणारी वारेमाफ बेफाम लूट थांबवून शेतकऱ्यांना वाचवो अशी तमाम शेतकऱ्यासह शेतकरी संघटनेची मागणी आहे. 'शेतकरी जगला वाचला तर देश जगेल वाचेल' म्हणून शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागणीचा न्यायालय नि संबंधित गांभीर्याने विचार करतील नि शेतकऱ्यांना योग्य न्याय देतील याकडे शेतकरी डोळे लावून बसलेले आहेत.

# शेतकरीविरोधी धोरण राबवाल तर रस्त्यावर उतरू - राजू शेट्टी

(पान १ वरून)

ते दोन टक्क्यांनी वाढ झाली. महागाईवर नियंत्रण आणण्याच्या नावाखाली फक्त शेतकऱ्यांचाच बळी का घेता, असा परखड सवाही शेट्टी यांनी यावेळी उपस्थित केला.

राज्यात सहकार चळवळ रसातळाला गेली आहे. राज्य बँकेवर प्रशासक असून महानंद, भूविकास बँका, साखर कारखाने अडचणीत आले आहे. त्या पार्श्वभूमीवर संघटनेच्या वतीने येत्या नऊ ऑगस्ट रोजी पुण्यात सहकार वाचवा परिषद आयोजित करण्यात आल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जागवाटपाच्या मुद्यावरून शिवसेना आणि भाजप यांच्यातच तणावाचे वातावरण आहे. त्यांचा समझोता झाल्याशिवाय अन्य घटकपक्षांना जागांचे वाटप होणार नाही, असे शेट्टी म्हणाले. लोकसभेच्या निवडणुकीत लवकर जागावाटप केल्याने प्रचारासाठी पुरेसा अवधी मिळाला होता. पण विधानसभा निवडणूक सोपी नाही. वर्षानुवर्षे सत्तेवरअ सलेल्या घराण्यांचा सामना करायचा असेल, तर आधीपासून तयारी हवी, असेही शेट्टी यांनी सांगितले.


## ग्लोबल ॲग्रो फाउंडेशन व पुणे जिल्हा साप्ताहिक, संपादक, पत्रकार, ग्रुप,

## साप्ताहिक पुण्यमत ११ वा वर्धापनदिन व राष्ट्ररत्न योध्दा शेतकरी पुरस्कार वितरण समारंभ व शेतकरी मेळावा.

दिनांक २७ जुलै २०१४ रोजी इंदापूर येथे दुपारी १ वाजता
संयोजक व निमंत्रक : **मा. विठ्ठलराव पवार** (संपादक)
**शेतकरी, कामगार, साखर कारखाने बचाव आंदोलन**

महोदय, साप्ताहीक पुण्यमत योद्धा शेतकरी जुलै २०१४ मध्ये ११ व्या वर्षात स्मरणिका पर्दापण करत आहे. याचा आम्हाला आनंद व अभिमान होत आहे.

सा. पुण्यमत योद्धा शेतकरी ११ व्या वर्धापन दिनानिमित्त आंदोलन स्मरणीका प्रकाशित करत आहेत.

सा. पुण्यमत, योद्धा शेतकरी, आंदोलन, येरवडा, विद्यापीठ, उत्तम शेती स्मरणीके पाठोपाठ आता आंदोलन एक वादळ, ही स्मरणीका प्रकाशित करत आहे.

... आमचे माननिय संपादक साहेब यांच्या यशस्वी लढ्यात महाराष्ट्र राज्यातल्या २०० साखर कारखान्यांना शेतकरी ऊस दरावर केंद्र व राज्य सरकारने लावलेला २५ हजार कोटींचा इनकम टॅक्सला स्थगिती आंदोलनातून मिळविली तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहीत याचीका दाखल केली. त्यास आज एक वर्षे पूर्ण होतयं.

महाराष्ट्रा राज्यातील शेतकऱ्यांना पिक विमा रक्कम थेट मिळावी यासाठी यशस्वी प्रयत्न करून शेतकऱ्यांच्या पदरात योग्य माप टाकण्यास सरकारला भाग पाडलं फेब्रुवारी - मार्च २०१४ मधल्या प्रचंड गारपिटा या आसमानी संकटातून शेतकरी बांधवांन कर्जातून मुक्त करण्यासाठी ४२ हजार कोटीची जनहित याचिका दाखल करून राज्यातील कोट्यावधी शेतकरी भावा, भगिनींना नुकसान भरपाई मिळवून देण्याबरोबरच कर्ज-विज बिल मुक्तीसाठी न्याईक लढा उभारला.

या गारपिटात सुरूवातीला ज्या ३७ शेतकरी भावांनी आत्महत्या केल्या त्यांच्या कुटुंबाच्या मदतीला जाऊन त्यांचे सात्वंन केलं त्याच्या दुःखात मनापासून सहभागी झाले. ८८ गारपिठा ग्रस्त गावाना प्रत्यक्ष भेटी दिल्या नुकसानीच्या पिकांची पाहणी केली.

इंदापूर, दौंड, बारामती, हवेली पूर्णपणे या तालुक्यातील गावांच्या शेतीला बारमाई पाणी मिळावे यासाठी पुणे महापालिका सरकार यांचेकडे सतत पाठपुरावा केला साधारण जुलै / ऑगस्ट २०१४ मध्ये मैला पाण्यावर प्रक्रिया करून ते पाईपलाइनव्दारे जुन्या कॅनॉलमध्ये पंपीगने टाकण्याचे काम पूर्ण होईल असे आश्वासन पुणे मनपाकडून मिळविले.

शेतकऱ्यांची मुले-मुली शहरांकडे शिक्षणासाठी जातात, त्यांना मिळणारी ईबीसी सवलतीची रक्कम अनेक मोठ्या मोठ्या शिक्षण संस्था ठापतात ती त्याचेकडून सुमारे ४० कोटी त्या विद्यार्थ्यांच्या मिळवून देण्यात यशस्वी अशा एकना अनेक ५० हजारांहून अधिक तक्रारींना न्याय देण्याची काम ज्या आंदोलनातून केले त्याचे पुस्तकरूपी प्रकाशन, साप्ताहिक पुण्यमत व राज्यातील शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या ग्लोबल ॲग्रो फाउंडेशन च्या वर्धापनदिनानिमित्त करत आहोत याचा आम्हाला आनंद होत आहे.

आमचे संपादक हे या चळवळीतले योध्दा आहेत हे सांगताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. दुसऱ्यांची दुःख हलकी करत स्वतःताचे आभाळा एवढे दुःख बाजूला सारणारा एखादाचा असतो तोच लाखाचा पोशिंदा!

**आपली, कु. शारदा पवार (संपादीका)**

सा. पुण्यमत ११ वा वर्धापनदिन दि. २७ जुलै २०१४ राष्ट्ररत्न योध्दा शेतकरी, पुरस्कार वितरण समारंभ

महोदय आपनांस नम्र विनंती की दिनांक २७ जुलै २०१४ रोजी ता. इंदापूर येथे होत असलेल्या शेतकरी मेळाव्यात आमचे संपादक विठ्ठलराव पवार लिखित आंदोलन व आमचे कार्यकारी संपादक स्वर्गिय विश्वजित विठ्ठलराव पवार यांनी लिहिलेल्या "आई-वडील, शेती, कविता संग्रह" प्रकाशित करत आहोत.

आपले व आपल्या संस्थेचे आम्हाला नेहमीच मोलाचे सहकार्य लाभले आहे. कृपया आपण वैयत्तिक, व्यवसाय, संस्थेची मदत निधी, व शुभेच्छा, जाहिरात देऊन सहकार्य करावे ही विंनती. कळावे.

**प्रमुख उपस्थिती :शेतकऱ्यांचे खासदार मा. राजू शेट्टी, मा. बी. जी. कोळसे-पाटील (निवृत्ती न्यायाधीश) मा. भाई वैद्य (मा. गृहराज्यमंत्री), मा. लक्ष्मणराव वडले (शिवसेना उपनेते महाराष्ट्र राज्य) मा. सदाभाऊ खोत, मा. कर्नल सी. आर. चितिबाबू, मा. हरिष पूरी (निवृत्त केंद्रीय अधिकारी)**

**❑ आपले स्नेहांकित ❑**


रविशंकर पवार (जाहिरात प्रसिध्दी प्रमुख)
श्रीमती संध्याराणी विश्वजित पवार (कार्यकारी संपादक)
कु. शारदा पवार (संपादीका)
**स्वागताध्यक्ष** - विठ्ठलराव पवार (मुख्यसंपादक मालक, मुद्रक, प्रकाशक)

**❑ जाहीरात दर पत्रक ❑**

मुख्य पान क्र. २ - ७५ हजार रूपये
मुख्य पान क्र. ३ - ७५ हजार रूपये
मुख्य पान क्र. ४ - ७५ हजार रूपये
आतील रंगीत पान पूर्ण - ३५ हजार रूपये
आतील रंगीत अर्धेपान - २५ हजार रूपये
आतील रंगीत पाव पान - १५ हजार रूपये
कृष्णधवल पूर्ण पान - २५ हजार रूपये
कृष्णधवल अर्धे पान - १५ हजार रूपये
शुभेच्छा जाहीरात रंगीत - १७ हजार रूपये
शुभेच्छा जाहीरत कृष्णधवल - ६ हजार रूपये
सा. पुण्यमत वार्षिक वर्गणी - १२५० रूपये दिवाळीअंकांसह

जाहिरात मजकूर, डी. डी. / पे -ऑर्डर / चेक **'साप्ताहिक पुण्यमत योद्धा शेतकरी आंदोलन विशेषांक'** पुणे या नावाने काढावा !

# लोणी -निमगाव केतकी पाणीपुरवठा योजना खड्ड्यात!




इंदापूर - महाराष्ट्र शासनाने जीवन प्राधिकरणाच्या निमगाव केतकी लोणी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस ८ कोटी ८८ लाख रूपये खर्च करूनही निमगाव केतकीसह ६४ वाड्या वस्त्या पिण्याच्या पाण्यापासुन वंचित असुन पंचायत समितीने टँकरने पाणी पुरवठा चालू केला आहे.

सविस्तर वृत्त असे की, निमगांव केतकी-लोणीही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून भाजप-सेना युतीच्या कालावधीत मंजूर केली होती. युती शासनाने महाराष्ट्र राज्य टँकर मुक्त करून प्रत्येक नागरिकाला पेयजल पुरेशा प्रमाणात मिळावे, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पुढील ३० वर्षाची लोकसंख्या ग्रहित धरून तयार करण्यात आली होती. ही धाडसी योजना शासनाने सर्व्हे करताना प्रत्यक्ष वाडीवस्तीवर जाऊन हेड काढून सर्व्हे केला गेला नाही. कागदोपत्री संबंधीत अधिकाऱ्यांनी एका जागेवर बसुन सर्व्हे केला व अंदाजे अंतर धरून मंजूरी घेण्यात आली. त्यामुळे या योजनेचे प्लॅन इस्टीमेंट कमी झाले. त्यामुळे वाढीव मागणी मंजूर करून घेण्यात आली व योजनेचे काम सुरू झाले.

काम सुरू केल्यानंतर संबंधीत कामाचे ठेकेदार खारोटे कंट्रक्शन कंपनी पुणे यांनी हे काम करत असताना ज्या ठिकाणी टणक खडक आहे, त्या ठिकाणी वितरण व्यवस्थेचे कामच केले नाही. या वाड्यावस्त्या मंजूर प्रस्तावामध्ये असताना सुध्दा वितरण नालिकेचे काम केले नाही व वितरण नलिकेचे पाईप सुध्दा निकृष्ट दर्जाचे असल्याने ती जागोजागी चेपली असुन फुटलेली आहे. या कंपनीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असुन ते पूर्ण केले नाही. काही वितरण व्यवस्थेमधील वितरणात नळ कोंडाळी काढली आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या या निमगाव केतकी लोणी-प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे पाणी अपुर्ण असल्याने या योजनेतील कोणत्याही गावच्या ग्रामपंचायतीने ही योजना ताब्यात घेतलेली नाही. पण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या योजनेची पुर्णतेची चाचणी घेण्याचे कारण सांगून त्यांनी प्रथम चालू केली.

ग्रामपंचायतीकडे योजना पूर्ण असून तिची चाचणी घेऊन तुमच्या ताब्यात घ्या, असे लेखी पत्र दिले. त्यावर ग्रामपंचायत सदस्यांनी ही योजना अपूर्ण असून तिचे निकृष्ट दर्जाचे आहे, हे वारंवार सांगूनही या कंन्स्ट्रक्शंन कंपनीने काम तसेच चालू ठेवून पुर्ण केले असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे तुम्ही ही योजना तीन महिने पूर्ण क्षमतेन चालवून दाखवावी, नंतर ही योजना ग्रामपंचायत ताब्यात घेईल असे ठरावात नमूद करून प्राधिकरण अधिकाऱ्यांना सांगितले. प्रथमतः ही योजना मार्च २००६ ते जून २००६ अशी चार महिने चालविली. त्यामध्ये पहिले चार महिने कोठे पाणी आले कोठे फुटतुट आहे. हे पाहण्यात गेले. पुढे ती नियमित चालू न ठेवता बंद केली.

या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आजपर्यंत कोट्यवधी खर्च करून ही योजना सध्या धुळ खात पडली असून पाणी शुध्दीकरण गृहात डोक्याइतके गवत वाढले आहे. मशीनरीज गंजून गेल्या आहेत. पाण्याच्या टाक्यांमध्ये घाण साठलेली आहे. तरी सुध्दा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना दुरूस्ती करीता २१ लाख रूपये किंमतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून तो मंजूरीच्या स्टेजवर असल्याचे समजते.

निमगाव केतकी, व्याहळी, लोणी, वकपुडी, कौठळी, गोतौंडी, कचरवाडी व निमगाव केतकीच्या ४६ वाड्यावस्त्यासाठी असणारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना असल्याने कोणतीही ग्रामपंचायत ताब्यात घेण्यास तयार नाही. कारण हा कारभार पाहणे, त्यांना पेलावणारे नाही. त्याबरोबर येणारे वीज बिल व दुरूस्ती खर्च भरमसाट आहे. त्यामुळे ही योजना चालविणे अवघड होते. निमगाव केतकी प्रादेशिक योजनेची ४७ लाख रूपये विज वितरण कंपनीची थकबाकी आहे. दुरूस्तीचा २१ लाखांचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर पंपींग मशनरी गंजली असून ती दुरूस्त करून टिकटिकाणची फुटतुट दुरूस्त करून पंधरा-वीस दिवसात ही योजना चालू केली जाईल. तसेच उजनीचे पाणी दूषित असले तरी त्याची चाचणी घेऊन शुध्द करून लोकांपर्यंत पोहचविले जाईल, असे उपअभियंता एस. एस. सप्रे यांनी सांगितले. परंतु एकंदर या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे तीन-तेरा आणि नऊ-बारा वाजले असून ही योजना सर्वांनी वाटून खाल्ली असून नागरिक मात्र पाण्यापासुन वंचित आहेत. याकडे कोणी लक्ष देणार की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# शेतकरी संघटनेची मुंबई उच्चन्यायालयात तक्रार; बाजार समित्यांच्या भ्रष्ट प्रकरणांची सीबीआय चौकशी करा

पणन संचालक, डॉ. सुभाष माने यांची सुडभावनेने केलेली बदली अनित्यौर्य रद्द करा, तसेच ३ जुलै रोजी पणन संचालनालयातील कागदपत्रे अधीक्षकांनी मंत्रालयीन अधिकाऱ्यांच्या ताब्यात देऊ नयेत, सदर कागदपत्रांचा ताबा सी. बी. आय. पोलीसांकडे द्यावा अन्यथा सर्व शेतकरी व संघटनांचा आसुड मोर्चा आंदोलनाबाबत शेतकरी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विठ्ठल पवार यांनी मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे, कृषी, सहकार व पणन आयुक्त आंना आज निवेदन देऊन माने यांच्या बदलीचा निषेध व्यक्त केला. सदर बाबत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांनाही याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे माने यांची बदली रद्द न झाल्यास न्यायालयात याचिका दाखल करून असा इशारा विठ्ठल पवार यांनी दिला आहे. यावेळी विठ्ठल पवार, गोरख घाडगे, हिरा‌ताई पवार, कौशल्याताई चाटे, मारूती पवार, रमेश चौधरी आदी उपस्थित होते.

# पणन संचालक डॉ. माने यांना पोलीस संरक्षण

पुणे : जीवितास धोका असल्यामुळे आयुक्तांकडे १२ जून रोजी पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली होती. मात्र, अद्याप संरक्षण मिळाले नसल्याची खंत राज्याचे पणन संचालक डॉ. सुभाष माने यांनी व्यक्त केल्यानंतर अखेर रविवारी सकाळी त्यांना संरक्षण देण्यात आले आहे, मात्र ते फक्त पुण्यापुरतेच आहे.

मुंबई बाजार समितीमधील गैरव्यवहार उघडकीस आणणाऱ्या सुभाष माने यांची तडकाफडकी बदली केली होती. त्यांनी मॅटमध्ये जावून स्थगिती मिळविली आणि पुन्हा कार्यभार हाती घेतल्यानंतर डॉ. माने यांनी पत्रकार परिषदेत संरक्षण मिळत नसल्याबाबत खंत व्यक्त केली होती.

डॉ. माने यांनी ११ मार्च रोजी पणन संचालक म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यानंतर मुंबई बाजार समितीच्या कामकाजात गंभीर दोष आढळून आल्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. काही दिवसांपूर्वी मुंबई बाजार समितीचे सचिव ए. जी. तांबाळे यांची हत्या झाली होती.

सध्या मुंबई बाजार समितीच्या गैरव्यवहाराची चौकशी सुरू आहे. तसेच सभापती बाळासाहेब सोळसकर यांनी ३१ मे रोजी भरसभेत डॉ. माने यांना बघून घेईन, अशी धमकी दिली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका असून, सुरक्षारक्षक उपलब्ध करून द्यावा, असे माने यांनी पोलीस आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद केले होते.


माने यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी सांगितले की, रविवारी सकाळीच आयुक्त सतीश माथुर यांनी दूरध्वनीवरून चर्चा करुन दोन पोलिस कर्मचारी संरक्षणासाठी देण्यात आले असल्याचे सांगितले. मात्र माने यांना राज्यभर दौरे करावे लागत असल्यामुळे त्यांना फक्त पुण्यापुरतेच संरक्षण देण्यात आले. मात्र माने यांना राज्यभरासाठी पोलीस संरक्षण आवश्यक आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरु असून येत्या दोन ते तीन दिवसात संरक्षण उपलब्ध होईल, अशी अपेक्षा माने यांनी व्यक्त केली.

## २२ जुलै पर्यंत अर्ज पाठवावेत
## राष्ट्ररत्न योद्धा शेतकरी पुरस्कारासाठी
## सा. 'पुण्यमत'चा वर्धापन दिन २७ जुलै रोजी

सा. पुण्यमत योद्धा शेतकरी ११ वा वर्धापन दिन २७ जुलै रोजी इंदापूर येथे होत आहे. ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन व पुणे जिल्हा साप्ताहिक संपादक पत्रकार संघाच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा यावेळी पार पडणार असून राष्ट्ररत्न योद्धा शेतकरी पुरस्कार, पुणे रत्न पुरस्कारां, विशेष समाजभूषण पुरस्कार हे राज्यस्तरीय पुरस्कार नामांकने मागविणेत येत आहे. एकूण ११ पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येणार असून यापूर्वी मा. भाई वैद्य, लक्ष्मणराव वढले, मा. प्रतिमा इंगोले, दिप्ती चौधरी, रमेश वांजळे, आयएएस चंद्रकांत दळवीसाहेब, आयएएस राजेंद्र चव्हाण साहेब, श्रीमंत कोकाटे, शरद गीरि, पत्रकार गणेश कोरे, गणेश आळंदीकर, अनिल साबळे, हनुमंत पाटील आदींना देण्यात आले आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवरांना (११) पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येणार असून संस्थेकडे अर्ज २२ जुलै पर्यंत पाठवावेत असे आवाहन संस्थापक सचिव राणा प्रेमजितसिंह पवार यांनी केले आहे.

अर्ज पाठविण्यासाठी : ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन
पत्ता : नामवैभव, कर्णल पार्क, योद्धा शेतकरी भवन,
केशवनगर, मुंढवा पुणे - ४११ ०३६.

## नाना भानगिरे मित्र मंडळ यांच्याकडून हडपसर विधानसभा मतदार संघातील ५००० रिक्षा चालक बांधवांना मोफत गणवेशाचे वाटप !



महमंदवाडी गावातील एक शेतकरी कुटुंबातील राजकीय वारसा नसताना लोकसेवेतून आपले नेतृत्व फुलवणारे असे लोकप्रिय कार्यक्षम नगरसेवक श्री प्रमोद नाना वसंतराव भानगिरे हे हडपसर विधानसभेचे जनसेवक होतात ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. त्याच माध्यमातून गेली ८ ते १० वर्षे हडपसर विभागात नाव लौकीक असून विविध, सामाजिक आणि धार्मिक कामे पार पाडीत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे रिक्षा चालक बांधवांचा सत्कार नव्हे सन्मान सह कुटुंबासह, स्नेहभोजन मेळावा हडपसर विधान सभेतील ५००० रिक्षा चालक बांधवांना मोफत गणवेश वाटप गुरूवार दि. १७ जुलै रोजी सा. ६ वा. स्थळ - कन्यादान मंगल कार्यालय, हडपसर, पुणे - २० नानांच्या भावी वाटचालीस केशवनगर मधील ग्रामस्थांच्या व सूर्यमुखीदत्त प्रतिष्ठान एकता ग्रुप व साप्ताहिक पुण्यमत च्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक : अजीज गुजर, रवि भोसले, संतोष शिंदे, सुभाष बांदल, जयदीप पिसाळ, भूपाळ वावले, राहुल मोरवाळे, सर्व मंडळाचे सभासद व क्रियाशिल कार्यकर्ते

वज्रमय शब्द व एकलव्य विचार असणारे एकमेव
साप्ताहिक

www.punyymat.com
Email - nvithal.fams@gmail.com

# पुण्यमत

पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रसिद्ध होणारे

• RNI.No.MAHMAR /2008/28522
• Decl. No. PHM/SR/188/2008




□ शुभेच्छुक □
विठ्ठलराव पवार - संपादक
शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य
ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन, बेलवाडी, इंदापूर, पुणे व पवार परिवार



मुख्य संपादक
विठ्ठलराव पवार

• वर्ष १० • अंक ४९ वा •
• गुरुवार दि. १९ ते २५ जून २०१४ •

पाने ४
किंमत २ रुपये

# शेतकरी संघटना साखर आयुक्तांना ३० जूनला निवेदन देणार

## गत वर्षाच्या ऊस उत्पादन खर्चात १००% वाढ झाल्याने एमआरपीची करणार मागणी.....

पुणे (कु. शारदा पवार) : राज्यात गेल्या ३ वर्षात सततचा दुष्काळ, २०१४ मधील गारपिठ यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले असून आसमानी संकटामुळे हातातोंडाला आलेले पिके वाया गेली तर साखर आयुक्तालयाच्या व सरकारच्या सुलतानी संकटामुळे शेतकरी पुरता मेटाकुटीला आला आहे. वरील संकटांतुन सावरण्यासाठी शेतमालाच्या उत्पादन खर्च (एफआरपी) त किमान ४० टक्के वाढ करण्यात यावी तरच एमआरपी ऐवजी एमआरपीची मागणी करणार तरच शेतकरी कसाबसा पुन्हा उभा राहू शकेल. अन्यथा गत ३ वर्षीचा कर्जाचा बोजा व या वर्षीचे गारपिठ, आसमानी संकट यातून शेतकऱ्यांना बाहेर पडणे मुश्कील होईल. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्च भरून निघेल एवढा दर मिळालाच पाहिजे. केंद्र व राज्य सरकारने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा यासाठी ३० जूनला मा. शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते मा. साखर आयुक्त, कृषी आयुक्त, सहकार आयुक्त यांना यावर्षीचा (सन१४/१५) ऊस गळीत हंगाम वेळेवर (दिं. १/९) ला सुरू करावा तत्पूर्वी २५ जुलै पूर्वीच ऊसदरांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन एफआरपीत किमान ४०% एवढी वाढ करावी यासाठी २५ जुलै २०१४ पूर्वीच सर्व शेतकरी संघटनांशी बोलणी करावी एफआरपी ऐवजी एमआरपी देण्याची तयारी सरकार व आयुक्त यांनी ठेवावी अन्यथा पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये त्यानंतर कायदा व सुव्यवस्था अथवा ऊस गळीत हंगाम उशीरा सुरू झाला याला शेतकरी संघटना जबाबदार राहणार नाहीत अशा आशायचे निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती विठ्ठल पवार (इंदापूर) यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### मुळामुठेच्या दूषित पाण्यावर इटीपी प्रक्रिया करून शेतीला ६ टीएमसी पाणी द्या अन्यथा दिलेल्या आश्वासनाची पूर्ती नजिकच्या काळात न केल्यास शेतकरी संघटना तीव्र आंदोलन छेडेल -विठ्ठल पवार



पुणे मनपा आयुक्त मा. विकास देशमुख साहेब यांच्यासमवेत चर्चा करताना विठ्ठल पवार, कर्नल सी. आर. चितीबाबू (निवृत्त)

वालचंदनगर :- पुणे मनपाने ड्रेनेजचे पाणी मुळा मुठा नदीच्या पात्रात सोडल्याने दूषित झालेल्या पाण्यामुळे उजनीचे पाणी पिण्यास अपायकारक झाले. त्यामुळे उजनी परिसरातल्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मुंढवा - मांजरा प्रकल्प पुर्ण होताच मार्च २०१४ पर्यंत त्या पाण्यावर ईटीपी प्रक्रिया करून ६ टीएमसी पाणी शेतीसाठी देवू असे अश्वासन देवूनही अद्याप पूर्तता न झाल्यामुळे शेतकरी संघटना आंदोलनाच्या पावित्र्यात आहे असा इशारा शेतकरी संघटनेचे सचिव तथा प्रसिध्दीप्रमुख विठ्ठल पवार यांनी दिला. (सविस्तर बातमी पुढील अंकात)

## कुमदा ग्रुपच्या गैरव्यवहाराची चौकशी करून शेतकऱ्यांची सुमारे १९ कोटी थकबाकी चुकती करा : विठ्ठल पवार

वालचंदनगर (पुण्यमत प्रतिनिधी):- रयत कुमदा ग्रुपने ऊस गाळप परवाना नसताना व ऊस पुरवठाधारक शेतकऱ्यांना केंद्राने जाहीर केलेल्या एफ.आर.पी.प्रमाणे दर न देता सर्वच साखर विक्री करूनदेखील शेतकऱ्यांची १८ कोटी ४४ लाख रूपये थकवुन घोर फसवणुक केली आहे. साखर आयुक्ताकडे वारंवार दाद मागुनही दखल न घेता आणि अविनाश भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांवर एफ.आय.आर.दाखल करून रितसर कायदेशीर चौकशीची व कारवाईची मागणी शेतकरी संघटनेचे राज्य प्रसिध्दीप्रमुख विठ्ठल पवार यांनी केली आहे.

शेवाळेवाडी ता.कराड जि.सातारा येथील रयत कुमदा ग्रुप शुगर्स युनिट ३ ने सन २०१३-१४ करिता गाळप परवाना घेतला नाही, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस गाळप करून केंद्राने जाहीर केलेल्या ऊसदराप्रमाणे त्यांना देयक आदा केले नाही, एकही साखरेचे पोते आजरोजी शिल्लक नसून सर्व साखरेची पोती विकली असतानाही शेतकऱ्यांची १८ कोटी ४४ लाख रक्कम आदा न करता थकित ठेवली, बेकायदेशीर व बोगस वजनकाटयाचा



साखर आयुक्तासमवेत चर्चा करताना शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते

वापर करून ऊसाच्या वजनाबाबत गैरकारभार केला, दगडखाणीत मोलॅसीस ठेवून प्रदूषण नियंत्रणाचे नियम धाब्यावर बसविले याबाबत राज्य शेतकरी संघटनेने आरोप केले असून कुमदा ग्रुपचे प्रमुख

(पान ४वर)

### शेतकऱ्यांना आता प्रतीक्षा पावसाची

पुणे : मृग नक्षत्र लागूनही यंदा राज्यात बहुतांश भागात पावसाने ओढ दिली आहे.

परिणामी खरिपाच्या पेरण्या खोळंबल्याचे चित्र आहे, तरी रविवार (ता. १५) नागपूर, धुळे, नाशिक, सातारा येथे काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी हलक्या सरी कोसळल्या. अन्य ठिकाणी मात्र शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे.


## साखर आयात शुल्कावर निर्णय नाही

वृत्तसंस्था : नव्याने सत्तारुढ झालेल्या सरकारने साखर उद्योगासाठी स्थिर धोरण राबवण्याची अपेक्षा भारतीय साखर कारखाना संघटनेने (इस्मा) व्यक्त केली. सुमारे ५ कोटी शेतकरी अवलंबून असलेल्या देशातील या उद्योगाला आयातशुल्क १५ टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत वाढवून संरक्षण देण्याची मागणीही इस्माने केली आहे. मात्र एवढा मोठा निर्णय घेण्यापूर्वी सरकारला या विषयावर तपशिलता विचार करावा लागणार असल्याचे वाणिज्य मंत्रालयाकडून सूचित करण्यात आले आहे. देशात साखरेचा अतिरिक्त साठा उपलब्ध असून त्याच्या विक्रीला चालना देण्यासाठी आयातशुल्क वाढविण्याची मागणी

(पान ४वर)



राज्यात इयत्ता १० वीत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनींचे हार्दिक अभिनंदन!



□ शुभेच्छुक □
मा. शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना, महाराष्ट्र राज्य
ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य
मु. पो. बेलवाडी, ता. इंदापूर जि. पुणे सर्व पदाधिकारी, अधिकारी कामगार वर्ग
सा. पुण्यमत - मुख्य संपादक विठ्ठलराव पवार, रविशंकर पवार

पुण्यमत दिनांक १९ ते २५ जून २०१४

# देशाचा अन्नदाता पोशींद्यावर सरकारचे सुलतानी संकंट झेलण्याचा बाका प्रसंग

पोटच्या पोराप्रमाणे जपलेले पीक डोळ्यांदेखील दम तोडताना पाहून जगाच्या पोशिंद्याचा जीव तीळतीळ तुटतो. रक्त आटवून शेत पिकवले; पण अस्मानी संकटांनी ते नष्ट झाले. दुबार, तिबार पेरणीचे संकट उभे ठाकले. 'अतिवृष्टी झाली हो', असे सर्वच सरकारी आकडे ओरडून ओरडून सांगतात. पण, आपल्याच यंत्रणेच्या आवाजावर विश्वास ठेवायला मायबाप सरकार तयार नसते. ''आम्ही दौरे करू. खातरजमा करून घेऊ. मग त्यावर समिती नेमू. मग ही समिती दुष्काळ आहे किंवा नाही, हे ठरवेल. शिफारस करेल. मग त्या शिफारशींची अंमलबजावणी करायची किंवा नाही, हे आम्ही ठरवू'', हा सरकारचा नेहमीचाच तोरा. ''हे पाहा होऽऽ अतिवृष्टीमुळे ज्वारीच्या दाण्याला अंकुर फुटला'', असा साक्षात पुरावा शेतकरी गावागावांत देत असतात. हे मढ्याचे पुरावेही दगडाचे हृदय असलेल्यास किंवा हृदयच नसलेल्या सरकारी यंत्रणेला मान्य नसतात. सरकारी मदत म्हणून एखाद्या शेतकऱ्याच्या हाती मग ८० रुपयांचा धनादेश पडतो. तेव्हा मुंबई-दिल्लीच्या दिशेने एखादाच शेतकरी दगड भिरकावण्याची हिंमत दाखवतो; अन्यथा अनेक शेतकरी मृत्यूला जवळ करीत असतात. अस्मानी संकटातून सावरण्याचे बळ मिळावे, यासाठी हिंमत जुळवत असताना, सुलतानी संकटाचे वार झेलण्याचा बाका प्रसंग सरकारच्या पोशिंद्यावर उद्‌भवतो. खर तर दुष्काळ आहे किंवा नाही, हे शास्त्रशुद्ध पद्धतीने सोदाहरण स्पष्ट करून देणारी प्रक्रिया आधीच उभारली गेलेली आहे. त्या आधारे तडकाफडकी दुष्काळ स्पष्ट होतो. या प्रक्रियेचे नाव पूर्वी 'आणेवारी काढणे' होते, आणि आता 'पैसेवारी काढणे' आहे. ब्रिटिशकालीन काळापासून ही पद्धत आहे. बदलत्या पीक पद्धतीत या पैसेवारी काढण्याच्या पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करून खरे तर ही पद्धती आणखी शिस्तबद्ध रीतीने राबविली जायला हवी होती. असे झाले असते तर मग दुष्काळ आहे किंवा नाही, हे सांगण्यासाठी कुण्याही मंत्र्या-संत्र्याच्या हवाई दौऱ्याची गरज भासली नसती. मदत घोषित करण्यासाठी महिनोगणती कालावधी लागला नसता. शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर वेळेत नुकसानभरपाई देता येऊ शकेल. पहिली पेरणी बुडाली तर दुसरी पेरणी करताना, बियाणे खरेदी करता येईल. गरजेनुसार तिबार पेरणीचीही जुळवाजुळव करता येईल. एवढेच काय, तर अख्खा हंगाम बुडाला तर त्याला सावरण्यासाठी पुरेसे अर्थसाहाय्यही उपलब्ध करून देता येईल. हे मायबाप सरकारला माहीत नाही, असे नाही. परंतु, त्याकडे शुद्ध डोळेझाक केली जाते. 'यथा प्रजा, तथा राजा', असे म्हटले जाते, हे बऱ्याच अंशी येथेही लागू होते. पैसेवारी हा शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा, जीवनमरणाचा विषय असतानाही त्याबद्दल खूपच कमी शेतकऱ्यांना, सरपंचांना, कृषितज्ज्ञांना माहिती असते, केवळ शेतकरीच नव्हे, तर पैसेवारी काढण्याच्या प्रक्रियेत ज्यांचा ज्यांचा म्हणून प्रत्यक्ष संबंध आहे, त्यातील ९९ टक्के लोकांना या पद्धतीविषयी अचूक माहितीच नसल्याचे अभ्यासाअंती स्पष्ट झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींना तर हा विषय आपला वाटतच नाही. पुणे जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधींचे याविषयी लेखी सर्वेक्षण केले असता, त्यातून तर ते आणखीच ठळकपणे उजागर झाले.

## पैसेवारी म्हणजे काय?

दरवर्षी प्रत्येक गावातील पीक परिस्थिती कशी आहे, हे शासनाने समजावून घेणे आवश्यक असते. एखाद्या हंगामात प्रमुख पिकांचे दर हेक्टरी उत्पादन किती आहे, ह्याची तुलना समाधानकारक हंगामात येणाऱ्या प्रमुख पिकांच्या उत्पादनाशी किंवा विशिष्ट पद्धतीने निर्धारित केलेल्या प्रमाण उत्पादनाशी केल्यास पीक परिस्थिती कशी आहे, हे समजून येते. त्याच आधारे शेतकऱ्यांना शासनाकडून द्यावयाचे सहाय्य निश्चित करण्यात येते.

आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लावू पणाला प्राण. ज्या देशातील शेतकरी देशाचा अन्नदाता पोशिंदा सुखी नाही, त्या देशाचे / राज्यांचे सरकार, कधी सुखी होऊ शकत नाही. शेतकरी सुखी, पोटात अन्न, तरच देश अन देशाचे सरकार सुखी. - विठ्ठल पवार - ९३७३३१३३११



**पैसेवारी हा शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा, जीवनमरणाचा विषय असतानाही त्याबद्दल खूपच कमी शेतकऱ्यांना, सरपंचांना, कृषितज्ज्ञांना माहिती असते. केवळ शेतकरीच नव्हे, तर पैसेवारी काढण्याच्या प्रक्रियेत ज्यांचा ज्यांचा म्हणून प्रत्यक्ष संबंध आहे, त्यातील ९९ टक्के लोकांना या पद्धतीविषयी अचूक माहितीच नसल्याचे अभ्यासाअंती स्पष्ट झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींना तर हा विषय आपला वाटतच नाही.**

## संपादकीय...
**विठ्ठलराव पवार**

विशिष्ट उत्पादनाची प्रमाण उत्पादनाशी तुलना करून काढलेली संख्येवारी म्हणजेच पीक परिस्थिती दाखविणारा निर्देशांक, यालाच पूर्वी आणेवारी व आता पैसेवारी म्हणतात.

उदाहरणार्थ : उत्तम परिस्थितीत तुमच्या शेतीत एका एकरात किती धान येतो?

### ग्राम पैसेवारी समिती पुढीलप्रमाणे असते

१) अध्यक्ष : राजस्व निरिक्षक (किंवा वर उल्लेख केल्याप्रमाणे पाच गावांच्या गटांकरिता नियुक्त केलेला तत्सम अधिकारी)

२) सदस्य सचिव : तलाठी

३) सदस्य : सरपंच

४) सदस्य : ग्रामसेवक

५) सदस्य : प्रगतीशील शेतकरी (१)

६) सदस्य : अल्पभूधारक शेतकरी (१)

७) सदस्य : अल्पभूधारक शेतकरी (२ सदस्य यापैकी शक्यतो एक महिला असावी)

८) सहकारी पतपुरवठा संस्थेचा अध्यक्ष ग्रामसभेतून प्रगतीशील शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी (महिलांसह) यांची निवड केली जाते. यांच्या स्वाक्षरीशिवाय पैसेवारीचा अहवाल कोणत्याही परिस्थितीत पुढे जाता कामा नये.

* समजा १० क्विंटल

* या दुष्काळी हंगामात किती धान होणार आहे?

* समजा अडीच क्विंटल

* याचा अर्थ जिथे १० क्विंटल उत्पादन व्हायचे, तिथे केवळ अडीच टिल म्हणजे एक चतुर्थांश उत्पादन झाले आहे. याचा अर्थ तुमची पैसेवारी २५ पैसे झाली आहे.

* यालाच पैसेवारी म्हणतात. तुमचे उत्पन्न २५ टक्केच झाले आहे, असा त्याचा अर्थ.

आणेवारी नव्हे, पैसेवारी : १९८०-८१ सालापूर्वी पैसेवारीला 'आणेवारी' म्हणायचे. त्यासच दशमान पद्धतीस करून आता 'पैसेवारी' असे संबोधले जाते. पूर्वी आण्यांत काम व्हायचे, काम चालायचे. १६ आणे म्हणजे रुपया व्हायचा. आता आण्यात काम भागत नाही. आता पैशात काम चालते. त्यामुळे पैसेवारी म्हटले जाते. अनेक वरिष्ठ अधिकारी, आमदार, खासदार व इतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी व सुज्ञलोकही पैसेवारी म्हणत नाही. आजही आणेवारीच संबोधतात. प्रसारमाध्यमातूनही अनेकदा आणेवारी असा उल्लेख होतो. परंतु आता पैसेवारी असा उल्लेख केला पाहिजे. आणेवारी उल्लेख थांबवायला हवा.

कोण काढते पैसेवारी? : प्रत्येक गावातील पैसेवारी काढण्याचे काम त्याच गावाच्या 'ग्राम पैसेवारी समिती' ला करावयाचे असते. राजस्व निरिक्षक ग्राम पैसेवारी समितीचा अध्यक्ष असतो. मंडलातील गावांची विभागणी करून सामान्यतः पाच गावांचा एक गट तयार करण्यात येतो. प्रत्येक गटातील पाच गावांच्या पैसेवारी समित्यांना स्वतंत्र अध्यक्ष असतो. एका मंडलात पाच गावांपेक्षा जास्त गावे असतात. त्यामुळे राजस्व निरिक्षक हा एकच व्यक्ती सर्व गावांचा अध्यक्ष होऊ शकत नाही. त्यामुळे त्याचा कार्यविस्तार वाढेल. त्यामुळे पाच पेक्षा जास्त गावे असल्यास, प्रत्येक पाच गावांच्या अध्यक्षासाठी राजस्व अधिकारी, अव्वल कारकुन, नायब तहसीलदार, पंचायत समितीचा विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी व इतर तत्सम अधिकाऱ्यांची सेवा उपलब्ध करून घ्यायची असते.

पैसेवारी कशी काढली जाते?

महाराष्ट्र राज्यात नजर अनुमानाने पैसेवारी जाहीर करण्यात येते. 'ग्राम पैसेवारी समिती' ने पीकाच्या कापणीपूर्वी गावातील शेतींना भेटी दिल्या पाहिजे. दृष्टीने अनुमानाच्या आधारे प्रत्येक पीकाच्या पैसेवारी संबंधीचे आपले मत लिहून ठेवले पाहिजे. प्रमाण उत्पादनापेक्षा यंदा किती उत्पादन होणार, याचा यात उल्लेख असतो. हे उत्पादन किती असेल, अर्थात किती टक्के असेल, हे यातून स्पष्ट होते. राजस्व निरिक्षक हे मत तहसीलदाराकडे पाठवितो. तहसीलदार पीकाचे तात्पुरते मूल्यमापन करतो व हे मूल्यमापन अर्थात ही पैसेवारी प्रत्येक गावांमध्ये जाहीर केले जाते. हंगामी किंवा सुधारित हंगामी पैसेवारी गावातील चावडीवर व संपूर्ण गावात दवंडी देऊन जाहीर केले जाते व गावातील ग्रामपंचायतीव्यतिरिक्त किमान दोन किंवा तीन जागी प्रसिद्ध केले जाते. मोठे गाव असल्यास किती जागी व कुठे कुठे प्रसिद्ध करावे अर्थात चिकटवावे, हा निर्णयही ग्रामसभेत घेतला जावू शकतो. पैसेवारीच्या माहितीचा कागद चिकटवताना त्यावर लिहिले जाते किंवा दवंडी देताना जाहीर केले जाते की या पैसेवारीवर कुणाला काही हरकत असल्यास १५ दिवसांच्या आत लेखी हरकत तहसीलदाराकडे नोंदवावी. हंगामी पैसेवारीला कुणाचीही हरकत नसल्यास हीच पैसेवारी अंतिम म्हणून जाहीर होते.

शेतकऱ्यांनी हरकत घेतल्यास किंवा ग्राम पैसेवारी समितीमध्ये एकमत नसल्यास किंवा पैसेवारी ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी असल्यास (अवर्षणप्रवण भागात ६० पैसे किंवा त्यापेक्षा कमी असल्यास) पीक कापणी प्रयोग केले जातात आणि त्यावरून अंतिम मूल्यनिर्धारण केले जाते.

### एक ना धड.... भाराभार समित्या

पैसेवारीच्या पद्धतीत सुधारणा करण्याकरिता वारंवार समित्या नेमल्या गेल्या. परंतु त्यांच्या शिफारशींचे पुढे काय झाले, हे कळायला मार्ग नाही. नेमलेल्या समित्या पुढीलप्रमाणे :

* श्री. व्ही. एम. जोशी : १९६२

* दांडेकर समिती : ३० ऑक्टोबर १९७३

* साठे समिती : १० डिसेंबर १९७६

* गायकवाड समिती : ५ मार्च १९८४

* राणे समिती : ४ मार्च १९८९

* भोळे समिती : १६ जुलै २००१

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विठ्ठलराव नामदेव पवार द्वारा चांगभलं क्रिएशन अँन्ड पब्लिसिटी, नामवैभव, कर्णलपार्क, स.नं.३७/२/१/१, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११ ०३६. यांनी समर्थ प्रिंटर्स ५५५, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - ४११ ०३० येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. मो. नं. - ९४२२५१७०४४ जाहिरात प्रमुखः रविशंकर पवार, श्री. योगिराजः ९८२२४९५९०४ कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड. पांडुरंग ढोरेपाटील, अ‍ॅड. डी. के. पवार (माजी अ‍ॅडीशनल जिल्हा व सत्र न्यायाधीश), काही वादविवाद- पुणे न्यायालयीन कक्षेत.

# साप्ताहिकी

श्रीमती संध्याराणी पवार

## राज्य कर्मचाऱ्यांना ५ दिवसांचा आठवडा पाहिजे : सरकारला धरले वेठीस

मुंबई : केंद्र शासनाप्रमाणे पाच दिवसांचा आठवडा, निवृत्तीचे वय ६० वर्षे आदी मागण्यासाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी मुंबई मंत्रालयासमोर निदर्शेने केली.

महाराष्ट्र राजपत्रीत अधिकारी संघटना व इतर संघटना मिळून राज्यात १९ लाखांहुन अधिक अधिकारी, कर्मचारी या आंदोलनात राज्यभर सक्रीय झाले होते. ३० दिवसांचा पगार घेणारे २० दिवसाच काम करणार पर वरून महागाई वगैरे लादणारे आता एकवटले असून राज्यातील उत्पादक शेतकऱ्यांनी देखील आता एकत्र आले पाहिजे.

अन्यथा फुकट खाणाऱ्यांची संख्या वाढली तर या देशाला उपासमारीची वेळ दूर नाही. सर्व नोकरशाही संघटीत होऊन सरकारला वेठीस धरते. अन् सरकारही पराभूत होण्याच्या भितीने त्यांचे लाड पुरविते हे अत्यंत धोकादायक असून केंद्र व सर्व राज्यात २६ दिवस सरकारी, निमसरकारी कर्मचारी, अधिकारी यांना १० ते ६ यावेळेतच कडक धोरण राबवून ७ दिवसांचा आठवडा देऊन ४ रविवारच सुटी द्यावेत असा सामान्य नागरीकांत बोलले जात आहे.

## मोफत बांधकाम व्यवसाय प्रशिक्षण

पुणे : बाएफ आणि लार्सन अँड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद, लातुर, रत्नागिरी व उरुळीकांचन (पुणे) येथे तीनम हिने कालावधीचे गवंडीकाम व बांधकाम व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येत आहे. किमान पाचवी पास असलेले १८ ते ३५ वर्षे वयोगटातील युवक या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. यासाठी उंची ५.५ फूट व वजन ४५ किलोपेक्षा जास्त असेण आवश्यक आहे. हे प्रशिक्षण पूर्णतः मोफत म्हणजेच निःशुल्क आहे. सहभाग निश्चितीसाठी ५०० रुपये अनामत रक्कम घेण्यात येत असून, प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यांनतर ही रक्कम परत दिली जाते. हे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची मुभा असून, इच्छुकांना रोजगाराची १०० टक्के खात्री देण्यात येत आहे, अशी माहिती बाएफचे प्रकल्प अधिकारी महेश कडुस यांनी दिली. अधिक माहितीसाठी संपर्क ९६६५२०७७७५

## अंगावर वीज कोसळून दोघांचा मृत्यू

नागपूर : शेतात गोवऱ्या वेचण्यासाठी गेलेल्या मुलीसह मासेमारी संस्थेचे अध्यक्ष अंगावरी वीज पडून ठार झाले. गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात अनुक्रमे ही घटना घडली. गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील अनखोडा येथे मंजूषा संभा बोरकुटे (वय १४ ही शेतात गोवऱ्या वेचण्यासाठी गेली होती. दरम्यान, तिच्या अंगावर वीज कोसळल्याने ती ठार झाली. मंजुषाची सहकारी मन्नाबाई विश्वनाथ कोडापे या घटनेत जखमी झाली. मृतक मंजूषा हिच्या कुटुंबीयांना तहसीलदार एस. टी. खंडारे यांनी तत्काल पाच हजार रुपयांची मदत दिली. वीज पडण्याची दुसरी घटना गोंदिया जिल्ह्यात घडली चोरखमारा येथील मासेमारी संस्थेचे अध्यक्ष नोहर मारबते हे तलावाकडे जात होते. याच वेळी त्यांच्या अंगावर वीज कोसळून ते ठार झाले. सोमवारी (ता. १६) वर्धा जिल्ह्यात काही ठिकाणी तुरळक पावसाने हजेरी लावली. पूर्व विदर्भातील वर्धा वगळता इतरत्र मात्र कोठेही पावसाची नोंद नसल्याने उकाड्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.


## धुळ्यात पावसाची दमदार हजेरी

धुळे : शहर व परिसरात रविवार (ता. १५) सायंकाळी पाचच्या सुमारास पावसाने दमदार हजेरी लावली. एक ते दीड तास पाऊस कोसळत होता. खरिपाच्या पेरणीसाठी सज्ज झालेल्या शेतकऱ्यांच्या आशा त्यामुळे पल्लवित झाल्या. शिंदखेडा तालुक्यातही रिमझिम पाऊस झाला. मात्र नगावसह धमाणे, बिलाडी, न्याहळोद, कापडणे, वरखेडी परिसरात पावसाची प्रतीक्षा कायम राहिली. शिरपूर, साक्री तालुक्यांतही शेतकरी पावसाकडे डोळे लावून बसले.

## त्र्यंबकेश्वरला हलक्या सरी

नाशिक : गेल्या दोन दिवसांपासून त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या शिवारात पावसाच्या हलक्या सरी कोसळत असल्याने यथील भात पिकाच्या रोपवाढीस पूरक वातावरण तयार झाले आहे. संत निवृत्तिनाथांच्या पालखीने पंढरपूराकडे प्रस्थान केल्यापासून पावसाळा प्रारंभ झाला आहे. या स्थितीत भात, नागली, वरई पिकांच्या पेरणीची लगबग वाढली आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील २६ हजार ४०० हेक्टर क्षेत्रावर पेरणी लक्ष्यांक ठरविण्यात आला असून, ११ हजार हेक्टरवर भात, ९ हजार हेक्टरवर नागली पीक, २ हजार हेक्टरवर उडीद, १५०० हेक्टरवर खुरासणी तर ९०० हेक्टरवर भुईमूग पेरणीचे उद्दिष्ट आहे. पावसाचा जोर स्थिती राहिल्यास लक्ष्यांक ओलांडण्याचीही शक्यता असल्याचे कृषी विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

# एनसीपी ला पाहिजे फिफ्टी फिफ्टी



मुंबई : राष्ट्रवादी सुप्रिमो श्री शरद पवार यांनी येणाऱ्या विधासभा निवडणुकीत फिफ्टी फिफ्टी जागेची मागणी केली असुन नुकतीच मुंबईत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यांची भेट घेतली त्यावेळी राष्ट्रवादीला १४४ सीट मिळाले तरच कॉंग्रेस बरोबर राहू. १४४ सिट लढवून नवनिर्माण होऊ शकते हे शरद पवार यांचे इंगीत कॉंग्रेसला मान्यच करावे लागेल. कारण राज्यात कॉंग्रेसला फक्त दोन जागा तर एनसीपी ला ४ जागा मिळाल्या आहेत तर पराभूत जागांवर एनसीपीचे विधनसभा मतदार संघ बऱ्याच ठिकाणी २ नंबरवर आहेत राष्ट्रवादीच्या ४ ही जागा धवधवीत यशाने निवडून आल्यावर कॉंग्रेसला निसटता विजय मिळाला हाही मुद्दा यावेळी पुढे आला असावा असे वाटते. तसेच मुख्यमंत्र्यांना सध्या कॉंग्रेसच्या नेत्यानीच अडचणीत आणले असून सीएमची खुर्ची वाचविण्यासाठी फक्त एनसीपी सुप्रीमोचा एक शब्द दिल्लीत हवा आणि तो मिळविण्यासाठी सीएम चव्हाण यांनी पवार यांची भेट घेतल्याचे कळते श्री. शरद पवार यांनी दिल्लीत कॉंग्रेस अध्यक्षांना चव्हाण यांचे बाबत शब्द दिला तर राणे, विखे, थोरातांचे पुन्हा पानिपत होऊ शकते.

# उपाध्यक्षपदी नुरुद्दीन सोमजी

## शिक्षण मंडळ : निवडणुकीत मनसे तटस्थ

पुणे : महापालिका शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षपदी कॉंग्रेसचे नुरुद्दीन अली सोमजी यांची निवड झाली. आज झालेल्या या निवडणुकीत सोमजी यांनी युतीचे किरण कांबळे यांचा ९ विरुद्ध ३ मतांनी पराभव केला. या निवडणुकीतही मनसेचे सदस्य तटस्थ राहिले.

शिक्षण मंडळामध्ये सत्ताधारी असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस आघाडीमध्ये उपाध्यक्षपद कॉंग्रेसकडे आहे. यापूर्वीच उपाध्यक्ष नरेंद्र व्यवहारे यांचा कार्यकाल संपुष्टात आल्याने त्यांनी राजीनामा दिल्याने या पदासाठी निवडणूक झाली.



पुणे : शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षपदी कॉंग्रेसचे नुरुद्दीन सोमजी यांची निवड करण्यात आली. यावेळी उपमहापौर बंडू गायकवाड यांनी त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी शिक्षण मंडळ अध्यक्ष बाबा धुमाळ, आमदार रमेश बागवे उपस्थित होते.

## प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजावर बंदी केंद्रीय गृहविभागचा निर्णय

वृत्तसेवा : राष्ट्रीय सणांच्या दिवशी लहान आकारातील प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांची मोठ्या प्रमाणात होणारी विक्री आणि त्यातून राष्ट्रध्वजाचा होणारा अवमान रोखण्यासाठी यापुढे राज्यात प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांच्या निर्मिती आणि विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय गृहविभागाने घेतला असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आणि पोलिसांना दिले आहेत. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या दिवशी राष्ट्रध्वजाविषयी असलेले प्रेम, निष्ठा, अभियान दाखविण्यास्री लोक मोठ्या प्रमाणात छोट्या कागदी आणि प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांचा वापर करतात. त्यामुळे अनेकजण प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाची खुलेआम विक्री करतात. मात्र हे ध्वज त्याच दिवशी संध्याकाळी किंवा दुसऱ्या दिवशी रस्त्यावर किंवा गटारात पडलेले असतात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान तर होतोच पण प्लॅस्टिकचे ध्वज बरेच दिवस नष्टही होत नाहीत. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान ही राष्ट्रप्रतिष्ठेच्या बाबतीत गंभीर बाब असल्याचे नमूद करीत केंद्रीय गृह मंत्रलायाने राज्य सरकारला दिलेल्या आदेशांनुसार राज्यात प्लॅस्टिक राष्ट्रध्वजांचे उत्पादक, विक्रेते आणि वितरकांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश गृहविभागाने दिले.

## मुंबईत नगरसेवकांना ई-निविदा पध्दत नकोशी

### ई-निविदा पध्दत मोडीत काढण्यासाठी सर्वच पक्ष सक्रीय

मुंबई - कंत्राटदारांची मक्तेदारी मोडून काढून कामाचा दर्जा राखता यावा यासाठी दस्तुरखुद्द पालिका आयुक्तांनी ई-निविदा पध्दतीची संकल्पना मांडली आणि नगरसेवकांचा विरोध मोडीत काढून तिची अंमलबजावणी केली. मात्र लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कामे होत नसल्याचे कारण पुढे करून नगरसेवकांनी ५० टक्के ई-निविदा पध्दत मोडीत काढली. आता विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेऊन उरलीसुरली ५० टक्के ई-निविदा पध्दत रद्द करण्याची मागणी नगरसेवक करू लागले आहेत. पालिका आयुक्त नगरसेवकांपुढे मान तुकवून ई-निविदा पध्दत पूर्णपणे रद्द करणार की पारदर्शकतेसाठी ही पध्दत कायम ठेवणार हे लवकरच स्पष्ट होईल.

कंत्राटदारांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे थेट मुंबईकरांना फटका बसत होता. तसेच आपापसात साटेलोटे करून कामे मिळविणाऱ्या कंत्राटदारांची पालिकेत मक्तेदारी झाली होती. नव्या कंत्राटदारांना कामे मिळू नयेत यासाठी कंत्राटदार राजकीय वजन वापरू लागले होते. कंत्राटदारांची ही मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी, तसेच कामात पारदर्शकता आणण्यासाठी आयुक्तांनी ई-निविदा पध्दतीचा अवलंब केला होता. पालिकेचे दरवाजे बंद झाल्यामुळे कंत्राटदारांनी राजकीय नेत्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवून कामे मिळविण्यासाठी मिनतवाऱ्या केल्या होत्या. परंतु आयुक्त आपल्या निर्णयावर ठाम राहिल्यामुळे राजकारणीही हतबल झाले होते.

नियमित वाचा ! पुण्यमत

# घाटकोपर सीएसटी फ्रि वे पूर्ण

## दररोज ६५ हजार गाड्या धावणार



खेरवाडी (विठ्ठल पवार) : मुंबईत नव्याने बांधण्यात आलेल्या घाटकोपर -सीएसटी फ्री वे दि. १६ जूनपासून सर्व नागरिकांसाठी खुला करण्यात आला असून त्याचे उद्घाटन मंत्री पृथ्वीराज चव्हण यांच्या हस्ते सोमवारी खेरवाडी येथे करण्यात आले. ईस्टर्न फ्री वे नंतर घाटकोपर सीएसटी फ्री वे चे काम पूर्ण झाल्याने दोन्ही पूल सुमारे १५ किलोमीटर लांबीचे असून यामुळे दररोज सुमारे ६५ हजार वहाने या पुलांवर धावणार आहेत. मुख्यमंत्री म्हणाले ५ वर्षात मुंबईत एमएमआरडी ने सुमारे १५ हजार कोटींची कामे पूर्ण केली असून पुढील ७/८ महिन्यात ७ हजार कोटींची कामे पूर्ण होऊन मुंबई ट्रॉफीक मुक्त होईल. राज्यातून मुंबईत येणाऱ्या नागरीकांना आता ट्रॉफीकचा त्रास कमी होईल. इंधनही वाचेल तर हे दोन्ही रस्ते टोलमुक्त असून सामान्य नागरीकही या रस्त्यावर फोर व्हीलर घेऊन जाऊ शकतो.

सुसाट वेडी वाकडी, मुदधुंद गाडी चालकांवर नजर ठेवण्यासाठी मोठमोठे सीसी-टीव्ही कॅमेरे या रोडवर लावले असून रोड रोमिओंना या रस्त्यावर लफडी करता येणार नाहीत फ्री वेच्या दोन्ही टोकांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या स्क्रीन वर ट्रॉफिक पोलीस नजर ठेऊन असणार आहेत. रोडरोमीओंवर गाडी क्रमांकासह यावर दिसणार असून चालकांनी भान ठेऊन सुरळीत वहाने हकावी लागणार आहेत.

नियमित वाचा
पुण्यमत

# 'किसन वीर' ची सिंचनातील आघाडी उल्लेखनिय



किसन वीरनगर, जि. सातारा : किसन वीर साखर कारखाना कार्यस्थळावरील किवीज ॲक्वा बाटलीबंद पाणी प्रकल्पाची पाहणी करताना श्रीमती आयरिश रॉन, महेश कलमाने, मदनदादा भोसले, अशोक डमाळ, संगेश परामणे, विशाल सावंत आदी.

सातारा - भविष्यात उपलब्ध पाण्याच्या काटकसरीने वापर होण्याच्या दृष्टीने शेतीमध्ये पाणी व्यवस्थापनाला अनन्य साधारण महत्त्व असून, त्या दिशेने कार्यवाही करताना किसन वीर साखर कारखान्याने कार्यक्षेत्रामध्ये ठिबक सिंचन वापरात घेतलेली आघाडी उल्लेखनिय आहे, असे प्रतिपादन इस्त्राईलस्थित नेटाफिम इरिगेशन इंडिया या कंपनीच्या चीफ फायनान्स ऑफिसर श्रीमती आयरिश रॉन यांनी केले.

मदनदादा भोसले यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ ठिबक सिंचनाला महत्त्व देत कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्यासाठी गेली चार वर्षे सातत्याने प्रयत्न करीत आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत कार्यक्षेत्रातील सुमारे नऊशे पन्नास हेक्टर ठिबक सिंचनाखाली आणण्यात कारखाना व्यवस्थापन यशस्वी झालेले असून, नेटाफिम इरिगेशन कंपनीचा यामध्ये मोठा वाटा असल्यामुळे श्रीमती आयरिश रॉन यांनी कंपनीचे दुसरे चीफ फायनान्स ऑफिसर महेश कलमाने, विकास सोनावणे, राजकुमार माळी, राहुल गायकवाड यांच्या समवेत किसन वीर कारखान्यास भेट देऊन अध्यक्ष मदनदादा भोसले, कार्यकारी संचालक विजय वावळे यांच्याशी चर्चा केली.

दरम्यान, श्रीमती आयरिश यांनी कारखान्याच्या विविध प्रकल्पांना भेट देऊन पाहणी केली. अध्यक्ष मदनदादा भोसले, ऊस विकास अधिकारी ए. जे. ढमाळ, विशाल सावंत यांनी माहिती दिली.

# कुमदा ग्रुपच्या गैरव्यवहाराची चौकशी करून शेतकऱ्यांची सुमारे १९ कोटी थकबाकी चुकती करा : विठ्ठल पवार

(पान १ वरून)

अविनाश भोसले यांच्यावर साधे एफ आय.आर.देखील दाखल न करता, कायदेशीर कारवाई न करता सहकार खाते व साखर आयुक्त त्यांना पाठीशी घालत आहे.याबाबत शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळवुन देण्यासाठी शेतकरी संघटनेने संबंधित विभागास लेखी देवून व समक्ष भेटून तक्रार देवूनही अद्याप जणु भोसले शासनाचे जावई असल्याप्रमाणे त्यांच्यावर कारवाईस काढता पाय घेत आहेत. त्यासाठी आंदोलन मोर्चाचे पाऊल उचलले तर पोलीसांचा ससेमिरा लावून आंदोलने चिरडण्याचा जाणूनबुजून प्रयतक केला जात आहे.उलट आंदोलकांच्या पाठीमागे पोलीसबळाचा वापर करण्याऐवजी पोलीसांचा ससेमिरा भोसले यांच्या पाठीमागे लावून रितसर चौकशी करून बेकायदेशीर व्यवहाराबद्दल भोसलेची चौकशी करून बिचाऱ्या बळीराजाने ऊन्हातानात घाम गाळून उत्पादन केलेल्या ऊसाबाबतचे सुमारे १९ कोटी देयक आदा करण्यास भाग पाडावे अशी तमाम शेतकऱ्यांनी शेतकरी संघटमेनेमार्फत मागणी केल्याचे पवार यांनी निवेदनाव्दारे सांगितले.

शुगर केन कंट्रोल ॲक्ट १९६६ अन्वये ग्रुपप्रमुख अविनाश भोसले, संचालक पाटील, कार्यकारी संचालक यांचेवर एफ.आय.आर.दाखल करून कसून चौकशी करावी यासाठी राज्य साखर आयुक्त मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांना लेखी निवेदने देवून समक्ष भेटून शेतकरी संघटनेने मागणी केली.पण सर्व परिस्थितीजन्य वास्तव पुरावे देऊनही संबंधित अधिकारी मुग गिळून गप्प आहेत.चौकशीचे कागदोपत्री फतवे काढून २७ मेला चौकशी केली जाईल असे साखर आयक्तालायाकडून शेतकरी संघटनेस लेखी कळविले आहे.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करून एफआरपीप्रमाणे ऊसदर देण्याच्या आदेशाची पायमल्ली करणाऱ्यावर कारवाई न केल्याबाबत राज्य साखर आयुक्तालयावरही न्यायालयीन कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचा ईशारा शेतकरी संघटनेमार्फत देणार असल्याचा ईशारा विठ्ठल पवार यांनी जाहिर केले.

यामध्ये शेतकरी संघटनेचे प्रदेश चिटणीस विठ्ठल पवार, सुभाष गायकवाड, श्रीकुमार सेन, दिपक भराडे, विनोद गायकवाड, प्रफुल्ल झोकरे आदी कार्यकर्ते साखर आयुक्त किशोर तोष्णीवाल राज्य साखर संघाचे अर्थप्रमुख सुनिल पवार डॉ.संजय भोसले पांडुरंग शेळके आदी बैठकीस उपस्थित होते.

# साखर आयात शुल्कावर निर्णय नाही

(पान १ वरून)


साखर उद्योगाकडून दीर्घकाळपासून केली जात आहे. नव्या सरकारकडून आर्थिक संकटात सापडलेल्या साखर उद्योगाला मोठ्या अपेक्षा आहेत. या उद्योगला स्थैर्याची आवश्यकता असून स्थिर धोरण राबवले पाहिजे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल, असे इस्माचे अध्यक्ष अजित श्रीराम यांनी म्हटले आहे.

केंद्रीय पर्यावरण मंत्री, पुण्यनगरीची शान
मा. प्रकाशजी जावडेकर
यांची राज्यसभेवर बिनविरोध
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !










मा. विनोद तावडे
आ. अनिल शिरोळे
मा. राजू शेट्टी










मा. [illegible] पाटील
मा. लक्ष्मण वढले
मा. सदाभाऊ खोत
मा. विठ्ठल पवार (संपादक)
❑ शुभेच्छुक ❑
मा. शरद जोशी साहेब प्रणित शेतकरी संघटना, महाराष्ट्र राज्य
पदाधिकारी कार्यकर्ते ता. इंदापूर, जि. पुणे
ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य
मु. पो. बेलवाडी, ता. इंदापूर जि. पुणे सर्व पदाधिकारी, अधिकारी कामगार वर्ग
इंदापूर ॲग्रो फाऊंडेशन निरगुडे ता. इंदापूर
मा. विठ्ठल पवार मित्र मंडळ, बेलवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे

वज्रमय शब्द व एकलव्य विचार असणारे एकमेव
साप्ताहिक
www.punyymat.com
Email - mvithal.fams@gmail.com

# पुण्यमत

पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रसिद्ध होणारे
• RNI.No.MAHMAR /2008/28522
• Decl. No. PHM/SR/188/2008




मुख्य संपादक
विठ्ठलराव पवार
• वर्ष १० • अंक ४६ वा •
• गुरूवार दि. २९ मे ते ४ जून २०१४ •
पाने ४
किंमत २ रुपये

# नविन पूर्व हवेली मनापाची नागरिकांची मागणी कायम

## दररोज २०० टन कचरा वाढणारा, गोरगरिबांच्या घरांचे काय?

**पुणे (विठ्ठल पवार)** मनपात नव्याने ३४ गावे समावेश करण्याचा निर्णय सरकारने अखेर घेतला पण त्याला मान्यता मिळेलच याची खात्री वाटत नाही. अनेक पक्षाचे गळनेते गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. आता मीच नगरसेवक म्हणून परंतु सर्व सामान्य नागरिकांनी गुंठा/२गुंठे जागा विकत घेऊन ऐपतीप्रमाणे घर बांधले मग ते अनाधिकृत कसे. जमिनीची गुंठे / २ गुंठे चे विक्री होताना शासन काय झोपले होते का? प्रचंड प्रमाणावर खरेदी विक्रीचा महसुल जमा करताना अनेक मंत्री अधिकारी यांनी स्वतःचे खिसे भरले नाहीत का? असा जळजळीत सवाल ३४ गावातील सामान्य नागरिक करत आहे. बिल्डर धार्जीन्या सरकारला नुकतीच जनतेने माती चाटायला लावली गुडघ्यावर नव्हे तर नेस्तानाबूत केले. तरीही त्या राज्यकर्त्यांचे डोळे का उघडत नाहीत



असाही सवाल सत्ताधारातील कार्यकर्ते दबक्या आवाजात करताहेत. पहिल्यांदा पूर्वीच्या समाविष्ट गावांचा आराखडा गेली २०ते२५ वर्षे रखडलेला आहे ते आत अजून निटपणे मार्गी लागलेला नसताना सरकारला पुन्हा ३४ गावे घेण्याची घाई का? वाघोली ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच व नागरिक मुंबई उच्च न्यायालयात सरकार विरोधात याचिका दाखल करणार आहेत ते योग्य असुन मुंबई उच्च न्यायालय पुणे मनपाच्या विरोधात निर्णय देईल यात शंका नाही. लोकसभेत सरकारने सपाटून मार खाल्यानंतर ही गावे समाविष्ट करून विधानसभा जिंकता येणे शक्य नाही. उलट जखमेवर मिठ चोळल्यासारखे होईल. येणारी सिट ही जातील त्यापेक्षा या भागातील गुंठेवारी खरेदी व्यवहाराप्रमाणे कायम करून सर्व मुळ बांधकामे नियमित करावीत, गावठाण जाहीर करावीत, जनतेला विश्वासात घेऊन पूर्णपुर्व हवेली नवनगर महापालिका निर्माण केल्यास विद्यमान सरकार तगू शकते. महापालिका वेगळी आहे तश्या ताब्यात राहतील मात्र सरकार विरोधात अगोदर जनतेचा रोष आहे.

" खरेदीखत व्यवहारांप्रमाणे गुंठेवारी कायम करा, " नियोजित आराखडा अगोदर तयार करा, " यापूर्वीची सर्व बांधकामे कायम करा. सरकार २००० पासुनची झोपडपट्टी कायम करते, फुकट्यांची सोय करते मग सामान्यांनी जागा विकत घेऊन बांधलेली घरे कायम करण्यास सरकारला त्रास का होतोय?


तो अजुन उफळू नये यासाठी ४/ ५ विल्डरची मेहरबानी जपण्यापेक्षा जनतेचा कौल, विश्वास महत्वाचा आहे हे या सरकारने व पालकमंत्र्यांनी लक्षात घ्यायला हवे असे जनतेचे मत आहे. २००० पासुन ज्या सरकारी जागा बळकावून फुकट्यांची सरकार सोय करते मग आम्ही कर भरून जागा खरेदी करून घरे बांधली ती अनाधिकृत कशी, बेकायदा कशी असा खडा सवाल अता जनता विचारू लागली आहे. पुणे मनपाचे क्षेत्रफळ दुप्पट करण्याचे काय उलट पुणे मनपाचे विभाजन करावे असे जानकारांचे मत आहे. मनपाचा कार्यकाळ पूर्ण होण्यास २ वर्षे बाकी आहेत. मग तोपर्यंत या गावांना वाली कोण? का मुकी बिचारी कुणी हका.... त्यापेक्षा पुणे मनपा विसर्जीत करून नविन गावे समावेश करून निवडणूका घ्या नंतर विभाजन करा असेही अनेकांचे मत आहे.

## जीवेत् शरदः शतम्

१ जून


हाजी एमडी शेख




मा. श्री. विठ्ठल पवार


अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष दै. बंधुप्रेमचे संपादक हाजी एम. डी. शेख व संलग्न पुणे शहर मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष
मा. श्री. विठ्ठलराव पवार
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



❑ शुभेच्छुक ❑
अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद
संलग्न, पुणे शहर कार्यकारणी सर्व सदस्य, अध्यक्ष, सचिव
पिंपरी चिंचवड शहर सर्व कार्यकारणी : अध्यक्ष व सदस्य
पुणे जिल्हा सर्व कार्यकारणी व सदस्य, अध्यक्ष डॉ. संदेश शहा

## अभिष्टचिंतन

१ जून


मा. श्री. विठ्ठल पवार

शेतकरी संघटनेचे सरचिटणीस, सा. पुण्यमतचे संपादक अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न पुणे शहर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष
मा. श्री. विठ्ठल पवार
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



❑ शुभेच्छुक ❑
मा. बबनराव काळे - कोषाध्यक्ष, शेतकरी संघटना महाराष्ट्र
मा. लक्ष्मणराव वढले - शिवसेना उपनेते जालना
मा. सौ. वंदना माळी - सांगली जिल्हा महिला आघाडी
मा. श्री. शंकर अण्णा गोडसे - पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, शे. संघटना
मा. श्री. दिपक भोसले - सोलापूर जिल्हा अध्यक्ष शेतकरी संघटना
मा. श्री. बाबुराव खरात - जालना मा. श्री. महादेव कोरे, मिरज
मा. श्री. राहुल म्हस्के, मा. श्री. श्रीकांत घाटगे (सरकार), कोल्हापूर

# बाघाच्या पाठीवर जखम झाली म्हणून बँकांचे कावळे चोच मारून लचके तोडताहेत

गेल्या ५०-६० वर्षापासुन सुरू असलेले साखर कारखाने कधी नव्हते एवढे तोट्यात गेले ह्यांचा गांभिर्याने विचार केला पाहिजे, साखर कारखान्याचे ज्यांना तुमच्या माझ्या बाप दादांनी संस्थापक बनवले त्यावेळी त्यांची ऐपत काय होती आणि आज त्यांची ऐपत काय आहे याचा माझ्या शेतकरी बांधवांनी विचार केला पाहिजे. साखर कारखाने मोडीत निघाले त्यांची दिवाळखोरी कोणी केली, साखर कारखाने तोट्यात गेले मात्र ज्यांना आपल्यांनीच संस्थापक चेअरमन केले ते चेअरमन मात्र करोडपती झाले आणि साखर कारखाने मात्र तोट्यात जाऊन बंद पडले म्हणूनच सहकारी साखर कारखाने भ्रष्टाचार मुक्त करावचे असतील तर सरकारवर शेतकरी संघटनेच्या माध्यमातून दबाव आणून सध्याची टिक मार्क ऑडीट पध्दत बंद करून कॉस्ट ऑडीट पध्दत बंधनकारक करायला हवी या भ्रष्टाचारावर जालीम उपाय म्हणजे कंपनी कायद्यातील कलम २३३ बी व सुधारित कलम २०९ (१) या कलमान्वये सहकारी संस्थांना कॉस्ट ऑडीट लागू केली तरच जादा बोगस खर्च करणाऱ्या कारखान्यावर जरब बसेल व फौजदारी गुन्हे दाखल करता येतील आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल.

प्लास्टीकच्या पिशवीतून कागदाच्या पुंगळ्या केलेले पुडक बाहेर काढत एका सडपातळ उंच प्रकाश गायकवाड नावाच्या शेतकऱ्यानं ते माझ्या हातात देत म्हणाला साहेब, मी शेती परवडत नाही म्हणून पोरासाठी तीनचाकी टेम्पो घेतला म्हटलं की शेतीला जोडधंदा असावा, पोरांना कष्ट करण्याची तयारी ठेवली. पाच-सात महिने धंदा बरा चालला पण शेती आणि टेम्पो यांचा मेळ बसेना कारण शेती विहिरीच्या पाण्यावर असल्यामुळे लाईटचा खेळखंडोबा सतत चालू त्यामुळं ८-१० महिने टेम्पोचे हप्ते भरले आणि तो पुन्हा कंपनीलाच विकला. आधीच शेतीचे कर्ज पुन्हा त्रास नको म्हणून टेम्पो विकला, वर्षभराने पुन्हा कंपनीची कर्जाची नोटीस आली. फायनान्सची माणसं दारात अटक करू म्हणून धमकी देऊ लागली. या भितीने घरातील पत्नी, दोन मुले, सुन हेही भयभीत झाले आणि इज्जतीच्या भितीने साऱ्या घरानं विष पिऊन आत्महत्या करण्याचा विचार केलाय असं सांगू लागला फायनान्सवाला पुन्हा वसुलीला आला तेव्हा मी सांगितल्याप्रमाणे त्यानं मला फोन केला आणि त्याला पकडून टेवून वालचंदनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यास सांगितलं. मीही पोहोचलो, गुन्हा दाखल झाला. आयपीसी ३९५, ३०७ वगैरे त्या अधिकाऱ्यांना घाम फुटला आणि आता खैर नाही म्हणून निसटून पळाला. शेवटी त्याने वसूली नोटीस मागे घेतली. हिशोब केला तर फायनान्स कंपनीकडेच १७ हजार रूपये उरले.

दौंडच्या एका ७५ वर्षीय वृध्द शेतकरी धोतरं, सदरा टोपी. हात थरथरत करत पुणे येथील मिटींग मध्येच आला त्यानं विचारले शेतकरी संघटनेचे कुणी आहे का? मी उठून पुढे आलो आणि विचारलं काय काम आहे, मी विठ्ठल पवार. बोला, हात थरथर करत कागदाचे पुंडके पुढे केले. १९९९ ला ५० हजार कर्ज घेतलं आणि ३ लाख परत केलं, ह्या पावत्या. तरी माझ्यावर सव्वा लाखाचं बोजा, या वयात मी कस फेडणार हे कर्ज. आयुक्त साहेबांची चर्चा केली, चौकशी लावली. दोषी सचीव इतरांची चौकशी सुरू झाली आणि दुसरचं कर्ज त्यांचे नावे दाखवलं. वाघाच्या पाठीवर जखम झाली तर बँकांचे कावळे त्याचे चोच मारून लचके कसे तोडतात. त्याचीही १३ हजारांहून अधिक उदाहरणे आहे. वाघ घायाळ झाला आहे, परंतू कावळ्यांनी तोडलेल्या लचक्यामुळे त्याला जीव नकोसा झाला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेड राजा तालुक्यातील वैष्णवी शुगरच्या चेअरमनने शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज दिलं आणि कारखान्यात आलेल्या त्या ऊस बिलापोटी कापूनही घेतलं. मात्र त्यानं ते बँकेला परत न करताच स्वतः संचालकांत संगमनत करून ढापलं. ५ कोटींचा आकडा मग शेतकऱ्यांचं बँकेच कर्ज तसंच. याला सरकारचे धोरण जबाबदार आहे. ऑडीटमध्ये हा घोटाळा उघड होऊनही कारवाई होत नाही.

शेतकरी आपल्या पिकांचं संगोपन करताना त्याला आपल्या मुलाबाळांपेक्षा जास्त जपतो. मुलं आजारी पडली तर दवाखान्यात नेत नाही. घरच औषधोपचार करतो मात्र पिकांवर रोग पडला तर लगेच उधार पावार करून औषध फवारणी करतो त्यांचे संगोपन करतो आणि पिकं जोमात आणतो, पिकं जोरदार आली की बाजारात नेतो त्यावेळी सरकार त्याचे भाव पाडते आणि तळहातावर जपलेलं पिकं मातीमोलानं विकावी लागतात. अनेकांना असे वाटते की, कर्जाच्या थकबाकीला शेतकरीच जबाबदार आहेत. हे खरे नाही. कर्ज काढताना विचार केला होता की, कर्ज काढून विहीर पाडू. विहिरीला पाणी लागेल. त्यावर भाजीपाला पिकवू, कर्जाची परतफेड करू. कर्ज काढून विहीर पाडली. पंपासाठी विजेचे कनेक्शन हवे, वर्ष दोन वर्ष कनेक्शन मिळाले नाही. मिळाले तेव्हा वेळेवर विजेचा पुरवठा झाला नाही. पाण्याविना पीक करपून गेले. बीज असून नसल्यासारखी कर्जाच्या व्याजाचे मिटर चालूच. विहिरीचे पाणी आटून गेले. कनेक्शनचा, मोटारीचा आणि पाईपलाईनचा खर्च बोकांडीवर बसला. विहिरीच्या कर्जाचे हप्ते थकले. यात शेतकऱ्यांची काय चूक आहे.

कधी पाऊस बक्कळ झाला नाही. कधी असा झाला की पीकच काय जमीनसुध्दा वाहून गेली. पिकांचे वाटोळे झाले.

## संपादकीय...

**विठ्ठलराव पवार**

कधीमधी पाऊस चांगला झाला. बक्कळ पेरण्या झाल्या. पीकही रसरसून आले, सगळा मेळ बसला, तर बाजारात भाव हमखास कोसळलेला. यायचे दहा हजार तेथे दोन हजारावर बोळवण झाली. कर्जाचा हप्ता देता आला नाही. या नाईलाजाला काय इलाज? आपण कर्जाचे हप्ते फेडू शकलो नाही म्हणून निराश होऊ नका कारण जोपर्यंत शेतीमालाच्या भावात सरकारची ढवळाढवळ आहे तोपर्यंत तुमची कितीही इच्छा असली तरी तुम्ही शेतीच्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करूच शकणार नाहीत. शेतकऱ्यांच्या डोक्यावरच्या कर्जाला शेतकरी जबाबदार नसून सरकारचे शेतकरीविरोधी धोरण जबाबदार आहे. कर्ज तुम्ही दिले अन् भावही तुम्हीच पाडले. अशा स्थितीत कर्ज कसे फेडणार? एखाद - दुसरा माणूस हलगर्जीपणा करणारा असू शकतो. त्यांच्या हलगर्जीपणामुळे तो कर्जबाजारी झाला असे म्हणता येईल. एखादा व्यसनाधीन असू शकतो. व्यसनापायी त्यांचे दिवाळे निघाले तर त्यालाही दोष देता येईल. येथे परिस्थिती वेगळी आहे. भेटेल तो शेतकरी कर्जबाजारीच. एकाच आजाराने सगळी गावे पछाडलेली. कोण असा शेतकरी आहे की ज्यावर कर्जाचा बोजा नाही? कर्जबाजारीपणाची साथ पसरली आहे. कर्जबाजारीपणाची लागण हा एकट्या-दुकट्याला झालेला रोग नाही सगळेच शेतकरी बाधीत आहेत.

सगळेच बाधित असल्यानंतर सगळ्यांनीच मिळूनच उपाय करावा लागेल. हा एकट्या-दुकट्यांचा प्रश्न नाही. एकट्या दुकट्याने डोक्यात राग घालून घेऊन काय उपयोग होणार आहे? तुम्ही घेतलेले कर्ज किती आहे? तुमच्यापेक्षा जास्त कर्ज घेऊन हजारो शेतकरी परिस्थितीला तोंड देत आहेत. आम्ही बारामती जवळच्या गावाला गेलो होतो. तेथील सोसायटीने यंदा एक कोटी रूपये पीक-कर्ज वाटले.

मराठवाडा, विदर्भात एखाद्या गावाच्या सोसायटीने दहा लाखांचे कर्ज वाटले तरी आश्चर्याने भुवया वर चढतात. त्या गावात लाखाच्या खाली कर्ज असलेला क्वचितच कारखानदारीच्या आणि बिगर शेतकरी क्षेत्रात तर कोट्यावधीची कर्जे असतात. लोकांनी लाखोंनी कर्ज काढले आहे, आपली फक्त हजारांची कर्ज त्यावरून एवढा बोभाटा कशाला? ज्यांच्यावर विश्वास टाकला त्यानेच गळा कापला?

शेतीमालाचा व्यवसाय तोट्यात ठेवला गेल्यामुळे शेतकऱ्यांचे सारे जीवन करपून गेले आहे. एक भगदाड बुजवायला गेलो की दुसरे आ वासते. सारे व्यवहार अडचणी येतात. एकातून दुसरा रोग पसरत जातो. कोणाचे आजारपण निघाले की आर्थिक फटका बसतो. मुलीच्या लग्नाचा बोजा वर्षानुवर्षे विस्तरावा लागतो, पेरणी पीकपाण्याला लावण्यासाठी नवा खर्च आला की अंगावर काटा येतो. हात पसरावे लागतात. एक दिवसाची सुगी असेल तर तोंड देऊ. शेतकऱ्यांच्या जीवनात रोजचीच सुगी, सारे आयुष्य हेलकावे खात जाणारे. दिवस वाईट आहेत. मान्य, परंतु उन्हाळ्यानंतर पावसाळ्याची आपण वाट पाहतोच ना. ऋतु बदलतात हा नित्याचा अनुभव आहे.

मग हतबल का व्हायचे? वाईट दिवसही जातील या आशावादाने आपल्याला साऱ्या जगाशी लढण्याचे बळ दिले आहे. आजपर्यंत आपण आपला कारभार केला. जे चटके बसले ते सगळे एकट्यानेच सोसले. बाहेरच्या जगातील मानहानी, अडीअडचणी घरी सांगितल्या नाहीत.

त्याची धग लागू दिली नाही. बाया माणसांनीही व्यवहाराची फारशी चौकशी केली नाही. इतके दिवस हे चालून गेले. आता एकट्याने गुमान सोसून चालणार नाही. कुटुंबातील महिलांना व्यवहाराची संपूर्ण माहिती दिली पाहिजे. तरच त्या अशा संकटकाळात कारभाऱ्याला धीर देऊ शकतील. एकमेकांच्या सुख-दुःखाची देवाणघेवाण अधिक मोकळेपणाने करायची ही वेळ आहे. खडतर काळात महिलांची भूमिका महत्वाची असते. त्यापुढे आल्या तर निराशेच्या गर्तेत कोसळत जाणाऱ्या शेतकऱ्याला त्या सावरू शकतील आणि गर्तेत लोटणाऱ्यांचा बंदोबस्त करू शकतील. शेतकऱ्यांनी जेथे म्हणून राज्यकर्त्यांवर विश्वास टाकला, सरकारने गळा कापला. बँकांनीच लचकेच तोडले. पावला पावलागणिक फसवणूक झाली.

सगळे शेतकरी एकाच जहाजातील प्रवासी आहेत. सगळेच अजूनही कर्जाच्या संकटात आहेत. अशा वेळेला एकमेकांना सावरण्याची जबाबदारी शेवटी प्रत्येकाची आहे. दुःख कोणी ऐकले तरी सांगणाऱ्याला हलके वाटते असे म्हणतात. दुसऱ्याचे दुःख कोणी ऐकले तरी सांगणाऱ्याला हलके वाटते असे म्हणतात. दुसऱ्याचे दुःख ऐकले तर ऐकणाऱ्याला मनाला आधार मिळतो. मनातल्या मनात आपल्या समोरील संकटाची तो तुलना करून पाहतो. त्यातून मार्ग दिसायला लागतो. गावोगावी शेतकऱ्यांच्या कैफियतीचे कार्यक्रम झाले तर कदाचित मनोबल गमावलेली माणसे लक्षात येतील. त्यांना आधार देता येईल. शेतकऱ्यांमध्ये संकटाचा सामूहिक मुकाबला करण्याचा आत्मविश्वास जागेल.

अनेकांनी संप करून आपल्या तुंबड्या भरून घेतल्या आता सरकारी शिपाई सुध्दा १५ ते २० हजार पगार घेतो.

अधिकारी तर त्याला पैसे खर्च कसे करावेत या विवंचनेत आहे ते सत्य. तरीही भ्रष्टाचार करून करोडोंची माया जुळवत असतोच हेही त्रिवार सत्य. मग याला एकच पर्याय. आता शेतकऱ्यांनी संप, शेतीमाल विक्री बंद आंदोलनाने सरकारची डोकी टिकाणावर येतील अन् डोकं फिरलेली राज्यातील सरकारं जागी होतील आणि केंद्र सरकारला शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित दर द्यावाच लागेल.


यासाठी सर्वांनी मा. शरद जोशी, राजू शेट्टी, लक्ष्मणराव वढले, बबनराव काळे, तसेच शेतकऱ्यांच्या सर्व संघटनांनी एकत्र येऊन आंदोलन उभारावे. तुम्हाला शेतकरी राजगादीवरच बसवतील या आंदोलनात आम्ही आग्रही राहू. जय जवान जय किसान.

— विठ्ठलराव पवार

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विठ्ठलराव नामदेव पवार द्वारा चांगभलं क्रिएशन अँन्ड पब्लिसिटी, नामवैभव, कर्णलपार्क, स.नं. ३७/२/१/१, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११ ०३६. यांनी समर्थ प्रिंटर्स ५५५, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - ४११ ०३० येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. मो. नं. - ९४२२५१७०४४ जाहिरात प्रमुखःरविशंकर पवार, श्री.योगिराजः९८२२४९५९०४ कायदेशीर सल्लागार : ॲड. पांडुरंग ढोरेपाटील, ॲड.डी.के. पवार (माजी ॲडीशनल जिल्हा व सत्र न्यायाधीश), काही वादविवाद- पुणे न्यायालयीन कक्षेत.

# अन्यायग्रस्तांचा कैवारी विठ्ठलराव पवार

असं म्हणतात की जगातला सगळा अंधार नाहीसा करता येत नाही. पण अंधाराला प्रकाशाचे भगदाड पाडतायेत हा विश्वास असणे गरजेचे' असाच विश्वास उराशी ठेवून बेलवाडी (ता. - इंदापूर) भवानीनगर सारख्या खेड्यात आपल्या समाजकार्याची सुरूवात करून गेल्या २५ वर्षात हजारो शेतकऱ्यांचे, कामगारांचे लाखो रूपये मिळवून देत कोट्यावधींचे भ्रष्टाचार बाहेर काढत संपूर्ण राज्यात विशेषतः पुणे जिल्ह्यात स्वतःचा वेगळा ठसा उमटवित यशाच्या शिखरावर पोहोचलेले व्यक्तिमत्व त्यांच्या नावातच विठ्ठल आहे. त्यांच्या कामातही सर्वांना विठ्ठलच जाणवतो.



**महाराष्ट्र राज्यातील गारपिट दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना ४२ हजार कोटींची नुकसान भरपाई मिळावी म्हणून हायकोर्टात धाव घेतलेले.**

**शेतकरी हितासाठी आयुष्यपणाला लावणाऱ्या व सर्वसामान्यांचे हितासाठी झगडणारे व्यक्तिमत्व म्हणजे विठ्ठल नामदेव पवार यांच्या १ जून वाढदिवसानिमित्त....**

अनुकूल वातावरण, केंद्रातून मिळणारी विविध अनुदाने, ऊस उद्योगासाठीची अल्पदरातील कर्जे, शासनाकडून संकट प्रसंगी मिळणारी मदत यामुळे ऊस कारखानदारी वाढली मात्र भ्रष्टाचाराचे प्रमाण देखील वाढतच गेले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंच्या प्रयत्नाने महाराष्ट्रातून माहिति अधिकाराचे आगमन झाले नि विठ्ठल पवारांची ताकदत वाढली.

विठ्ठल पवारांनी जवळपास १३५०० पेक्षा अनेक प्रकरणे ज्यात शेतकऱ्यांचे कोटयावधी हित साधले गेले अशी प्रकरणे निकाली काढून शेतकऱ्यांना फायदा करून दिला.

माहिती अधिकाराव्दारे पतसंस्थेतील गैरव्यवहार असो अथवा जिल्हा मध्यवर्ती बँकांतील अधिकाऱ्यांची मनमानी कारभार असो सर्वानाच त्यांनी वरिष्ठ पातळीववरून कायद्याच्या चौकटीत काम करणे भाग पाडले.

रयत सहकारी कारखान्यातील गैरकारभाराची तक्रार साखर आयुक्तांडे देऊन काटेवाडीतील तीन शेतकऱ्यांसह १२ शेतकऱ्यांचे ४४ लाख रू. ३० दिवसात मिळवून दिले. सांगोला सह. साखर कारखान्यातील शेतकऱ्यांचे बुडलेले १ कोटी १८ लाख ८ हजार वसूल करून दिले, पुणे जिल्हा अजिंक्यि ऊसाचे १९० लाख ८ हजार शेतकऱ्यांना वसूल करून दिले, पुणे जिल्हा अतिरिक्त ऊस गाळप न झाल्याबद्दल ११४७ शेतकऱ्यांना १ कोटी ८७ लाख रू मिळवून दिले.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत शेतकऱ्यांचे पैसे वाटप न करता सांगोला सह. कारखान्याच्या कर्ज खाती जमा केल्याने तेथेही दोषींवर कारवाई करणेस भाग पाडले त्यामुळे सोलापूर डीसीसी बँकेच्या कार्यकारी संचालकाला बडतर्फे करण्यासाठी प्रयत्न केले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने पावणे दोन लाख शेतकऱ्यांचा उतरविलेला विमा नियोजनाचा भार परवडत नसलेले कारणावरून बंद केली, त्याबाबतही सध्या संघर्ष सुरू आहे.

छत्रपती कारखान्यामध्ये ज्या महिलेचे नाव मतदार यादीत नाही त्यांची संचालक म्हणून नेमणूक, अनेक संचालकांवर थकबाकी, सोमेश्वराचे बोगस टेंडर प्रकरण असे अनेक प्रश्न माहिती अधिकार, शेतकरी संघटना, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व पुणे जिल्हा व शहर मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी धसास लावले त्यात उच्चतंत्र शिक्षण संस्थामधील ईबीसी आर्थिक घोटाळा, विद्यार्थ्यांना त्यांच्या ईबीसी रकमा परत मिळवून दिल्या, राज्यातील १२० कोटीचा चारा घोटाळा, तालुका खरेदी-विक्री संघातील १ कोटी ९ लाखाचा घोटाळा, शेतकऱ्यांना शेती पिक विम्याचे अनुदान १८७ कोटी थेट मिळवून दिली. यात पुणे, नगर, सोलापूर, सांगली जिल्ह्यांचा समावेश अधिकचा आहे.

फलटण जिल्हा सातारा येथील निवासी अनाथ मुलींना होत असलेल्या जाचातून सुटका तसेच कोरेगांवा तालुक्यातील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीकडून ४८ तासात ५६ लक्ष रूपये परत मिळवून दिले.

अनेक ठेविदारांना त्यांचे बुडीत ठेवी परत मिळवून दिल्या.

या शिवाय वैयक्तिक अन्यायालाही वाचा फोडून अनेक सर्वसामान्यांना त्यांनी न्याय मिळवून दिला आहे. हे सर्व करीत असताना त्यांना त्रासही मोठ्या प्रमाणात झाला. दोन वेळा भवानीनगर परिसरात २००८ च्या एप्रिल महिन्यात त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. तरीही त्यांनी न डगमगता आपले समाजकार्य चालूच ठेवले.

तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारें, मा. शरद जोशींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनी त्यांची वाटचाल चालू आहे. त्यांचे कार्य पाहून झुंझार माणसा हुंज हे असेच म्हणावेसे वाटते आणि त्यांना सांगावेसे वाटते आपण आपनाच विवेक हा तयामत गहिलो आपण जे करतोय ती हट्टीपणा काही ती मुल्यांसाठी संघर्ष आहे हे जर त्यातून निष्पन्न होत असेल तर इतरांनी कितीही धक्के दिले तर त्याचा त्रास होत नाही, विपरीत परिस्थितीही स्वतःचा विवेक जपता येतो हिच त्यांची ताकद आहे. अशा या व्यक्तीमत्वाला राज्यातील सर्वच शेतकरी प्रेमी जनता व ज्यांना न्याय मिळवून दिला त्या नागरिकांतर्फे पुढील कार्यास १जून वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!


- ॲड. गणेश आळंदीकर
सोमेश्वर नगर
ता. बारामती जि. पुणे.

## अभिष्टचिंतन

**दि. १ जून ते ४ जून वाढदिवसानिमित्त मान्यवरांना हार्दिक शुभेच्छा !**



मा. विठ्ठलराव पवार (संपादक)
युवा नेते शेतकरी संघटना (शरद जोशी प्रणीत)
पुणे जिल्हाध्यक्ष तथा सरचिटणीस
(वाढदिवस १ जून)




मा. मधुकरराव पिचड
अध्यक्ष अगस्ति स. सा. क. लि.
अहमदनगर
(वाढदिवस १ जून)



मा. हरिभाऊ जावळे
अध्यक्ष : मधुकर स. सा. का. लि.
जळगांव
(वाढदिवस १ जून)




मा. रामचंद्र जगदाळे
अजिंक्यतारा स. सा. का. लि.,
सातारा
(वाढदिवस १ जून)




मा. सुरेश गलांडे
अध्यक्ष : अशोक स. सा. का. लि.
अहमदनगर
(वाढदिवस १ जून)




मा. विदुरानाना नवले
अध्यक्ष : श्री संत तुकाराम स. सा. का. लि., पुणे
(वाढदिवस १ जून)



मा. श्री. देविदास पिंगळे
अध्यक्ष : नाशिक स. सा. का. लि.
नाशिक
(वाढदिवस १ जून)



मा. विठ्ठलराव अंबरीकडर
अध्यक्ष : केदारेश्वर स. सा. का.
जि. अहमदनगर
(वाढदिवस २ जून)




मा. अशोकराव पाटील
अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, स. सा. क. लि. बीड
(वाढदिवस ३ जून)

## जिल्हा बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा; शेतकरी आत्महत्या प्रकरण

न्हावरे - शिरसगाव काटा (ता. शिरूर) येथील चव्हाणवाडी परिसरातील आत्महत्याग्रस्त शेतकरी विकास मारूती चव्हाण (वय ३०) या तरूण शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत टरल्यामुळे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर व संबंधित वसुली अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांवर तत्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश शिरूरचे तहसीलदार यांनी शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर सहा दिवसांनी शिरूरच्या पोलिस निरीक्षकांना दिले आहेत.

याबाबत विकास चव्हाण याचे वडील मारूती चव्हाण व शेतकरी संघटनेचे राज्याचे सरचिटणीस विठ्ठल पवार यांनी तहसीलदाराकडे निवेदनाव्दारे मागणी केली होती, त्यानुसार तहसीलदारांनी शिरूरच्या पोलिस निरीक्षकांना कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यामुळे उशिरा का होईना शेतकऱ्यांच्या कुटूंबाला न्याय मिळवण्यास मदत होणार आहे, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

विकास चव्हाण या शेतकऱ्याने दि. २८ मार्चला कर्जबाजारीपणामुळे व बँकेच्या अधिकाऱ्यांच्या तगाद्यामुळे आलेल्या नैराश्यातून अंगावर रॉकेल ओतून घेऊन आत्महत्या केली होती. मात्र, याबाबत प्रशासनानें दुर्लक्ष केली होते.



मा. विठ्ठल पवार (संपादक)

# जीवेत् शरद: शतम्




महाराष्ट्र प्रदेश शेतकरी संघटनेचे
धडाडीचे कार्यक्षम नेतृत्व
**मा. विठ्ठलराव पवार (संपादक)**
यांना १ जून वाढदिवसानिमित्त
**हार्दिक शुभेच्छा !**

सहीच पुण्यनगरीचे आशास्थान
**मा. ना. प्रकाशजी जावडेकर**
यांची केंद्रीय मंत्रीमंडळात
**निवड झाल्याबद्दल**


**हार्दिक अभिनंदन !**



मा. शिवाजीराव आढळराव पाटील
शिवसेना हॅट्रीक खासदार



मा. अनिल शिरोळे
नवनिर्वाचीत पुण्यनगरीचे खासदार





मा. ना. विनोदजी तावडे
विधानपरिषद वि. प. नेते



मा. प्रकाश जावडेकर
केंद्रीय मंत्री

**शेतकरी हितासाठी एकच
लक्ष, विधानसभा..**





मा. राजू शेट्टीसाहेब
शेतकरी संघटनेचे खासदार



मा. लक्ष्मणराव वडले साहेब
शिवसेना ऊपनेते महा. राज्य (जि. जालना)

❑ शुभेच्छुक ❑

**मा. शरद जोशी साहेब प्रणित शेतकरी संघटना, महाराष्ट्र राज्य**

पदाधिकारी कार्यकर्ते ता. इंदापूर, जि. पुणे

**ग्लोबल ॲग्रो फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य**

मु. पो. बेलवाडी, ता. इंदापूर जि. पुणे सर्व पदाधिकारी, अधिकारी कामगार वर्ग

**इंदापूर ॲग्रो फाऊंडेशन निरगुडे ता. इंदापूर**

**मा. विठ्ठल पवार मित्र मंडळ, बेलवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे**